जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जरांगेची सरसी; जिंकणे लांबणीवर; राज्य सरकारची मात्र झाली फरपट

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेली वीस दिवस उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांनी अंतरवली सराटी येथून मुंबईच्या दिशेने कूच केली. पोलिसांनी परवानगी नाकारुनही त्यांचा मुंबईत उपोषणाचा निर्धार कायम होता. प्रवासात ते बीड जिल्ह्यातील पाटोदापर्यंत पोहोचले होते. त्यांच्या उपोषणाला राज्यभरातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे पोलिसांच्या गोपनीय अहवाल सरकारला प्राप्त झाले असणार परिणामी राज्य शासनाने चर्चे चे दरवाजे जे बंद करण्याची वल्गना केली होती, त्याला मुरड घालून मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने धाव घेतली. पाटोद्यात जरांगे यांच्याशी आरक्षणाच्या मागण्याबाबत चर्चा करत त्या तत्वत: मान्य करण्याच्या संदर्भात आश्वासित केले. सरकार दोन पाऊल मागे सरकले तोच पवित्रा जरांगेंनी घेत तूर्तातूर्त तीन महिन्यासाठी उपोषण स्थगित ठेऊन आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला, तसा हा आरक्षण सामना 'ड्रॉ' झाला. जरांगेंची सरसी झाली असली तरी तहाच्या बोलणीमुळे जिंकणे लांबणीवर पडले, पण या निमित्ताने सरकारची मात्र फरफट झाली. हा तिढा इतक्या सहजासहजी सुटणारा नसल्याने सरकारची त्रेधातिरपीट होणार, असाच रागरंग दिसतो.

## सरकार गुडघ्यावर

राज्य सरकारच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी यापुढे जरांगे यांच्याशी चर्चा नाही, अशी वल्गना मोठ्या अर्विभावात केली होती. एवढेच काय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक मंत्र्यांनी जरांगे यांच्या भाषेला आक्षेप घेऊन उघड नाराजी प्रदर्शित केली होती. त्यांची भाषा महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभादायक नाही, असे मंत्री भुजबळ यांनी ठासून सांगितले. तरीसुद्धा सरकार चर्चेसाठी गुडघ्यावर का आले? याचे उत्तर गणेश उत्सव आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या कार्यक्रमात दडलेले दिसते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगरमध्ये हा समारंभ होता, त्याला मराठा आंदोलकांनी गालबोट लावणे सरकारच्या प्रतिष्ठेला परवडणारे नव्हते. त्यामुळेच सरकारी शिष्टमंडळ आदल्या दिवशीच पाटोद्यात पोहोचले आणि त्यांनी तडजोडीचा मसुदा जरांगेंकडे मान्य करुन आजचे मरण उद्यावर ढकलले. त्यातही जरांगे जर मुंबईपर्यत पोहोचले तर गणेशोत्सवात अभूतपूर्व स्थिती निर्माण होऊ शकते, असे गोपनीय रिपोर्ट सरकारला प्राप्त झाले असणार, त्यात जरांगे आंदोलन प्रकरणी कोर्टाने आदेश करणे टाळले होते. पोलिसांचा अहवाल अनुकूल नसणार, परिणामी सरकार गुडघ्यावर आले.

## आश्वासनांचा तिढा

जरांगे यांनी उपोषण स्थगित करण्यासाठी पाच मागण्यांची हमी घेतली, त्यात १) ५८ लाख नोंदीतून एकही नोंद कमी होऊ नये, २) हैद्राबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रासाठी सुधारित शासननिर्णय काढावा, ३) सातारा, औंध, पुणे, कोल्हापूर गॅझेट लागू करा, ४) हैद्राबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रांना वैधता द्यावी, प्रमाणपत्र रद्द करु नये, ५) मराठवाड्यातील चार जणांची जी प्रमाणपत्र रद्द केलीत, ती वैध ठरवण्यात यावीत. वास्तविक सरकारची गोची नेमकी याच मुद्यावर होणार आहे. लोकप्रतिनिधींची जी प्रमाणपत्र रद्द झाली, ती वैध करण्याची आता नेमकी कायदेशिर प्रक्रिया कोणती अवलंबणार आणि ती कोर्टात टिकणार का, हाच खरा कळीचा तिढा असून, त्यात सरकारचा कस लागणार आहे. सरकार त्यात मुख्यमंत्री फडणवीस मोठ्या राणाभीमदेवी थाटात सांगत होते की, १३ पैकी १२ मागण्या यापूर्वीच मान्य केल्या आहेत. आता नव्याने 'जी आर' काढावा लागणार म्हणजे सरकारचा दावा केला होता, यावर शिक्कामोर्तब होते. जरांगे हे कसलेले मुत्सद्दी आहेत, त्यांनी आतापर्यंत ९६ दिवसांचे उपोषण केलेले आहे. सरकारला कसे खिंडीत गाठून मागण्या मंजूर करायच्या, हे कसब त्यांनी साध्य केले आहे. हा गडी अशिक्षित असून त्याचा आरक्षणाचा अभ्यास नाही, ही मंत्री छगन भुजबळ आणि 'हाके'ला चपराक आहे. जे भले भले करु शकले नाही, ते जरांगे साध्य करतात म्हणून त्यांनी उपोषण स्थगित करुन ९० दिवसांची मुदत दिली. सरकार कदाचित फसवणूक करु शकते, हे गृहित धरल्याने नवी मुंबईमध्ये जसा गुलाल उधळून विजयोत्सव साजरा केला, तसा तो यावेळी त्यांनी केला नाही, ही सबुरी त्यांची राजकीय खेळी आहे, हे विरोधकांनी लक्षात घेतले पाहिजे.

## राष्ट्रवादीला डावलले?

राज्यात महायुतीचे सरकार आहे. कोणताही महत्वपूर्ण निर्णय भाजप, शिवसेना (शिंदेगट), राष्ट्रवादी (अजित पवार) हे पक्ष एकत्रित घेतात, मग मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने अधिकृत चर्चा करुन आश्वासन दिले, त्यात भाजप आणि शिंदे सेनेचे मंत्री आणि आमदार होते. त्यात राष्ट्रवादी (अजित दादा) पक्षाचे प्रतिनिधी कोणीच नव्हते, मग त्यांना बाजूला ठेवले का, त्यांना डावलण्याचे प्रयोजन शंका निर्माण करणारे ठरु शकते.

## मराठा मुख्यमंत्र्यांवर आक्षेप का?

माजी मुख्यंत्री शिंदे यांचा अपवाद वगळता आतापर्यंतच्या मुख्यमंत्र्यांनी मराठा असताना आरक्षण का दिले नव्हते. जे काही दिले ते तर मुख्यमंत्री फडणवीस यांनीच, असा भाजपचा युक्तिवाद आहे, त्यात ते प्रामुख्याने शरद पवार यांचेच नाव घेतात. मंत्री चंद्रकांत पाटील उघड प्रतिक्रिया देतात. ओबीसी आरक्षण शरद पवारांनी दिले, त्यावेळी मराठ्यांना का दिले नाही? असा त्यांचा सवाल आहे. सध्याची स्थिती पाहता त्या काळात आरक्षण का दिले नव्हते, याचे उत्तर आपोआप मिळते. मुख्यमंत्री हा कोणत्या जातीचा अथवा पक्षाचा नसतो. तो राज्याचा प्रमुख असतो, त्यांना दुजाभाव करता येत नाही. फडणवीस आणि यापूर्वी मनोहर जोशी मुख्यंत्री झाले मग ते ब्राह्मणांच्या मागण्या पूर्ण का करु शकत नाही, याचे उत्तर द्यावे.

## विखेंची गोची

गणेशोत्सव असल्याने जरांगे यांनी मुंबईत येवू नये, असा पवित्रा सरकारचा होता, पण तो न पटणारा आहे. गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरु केला. घरातला गणपती रस्त्यावर सार्वजनिक केला, तो जनजागृती आणि प्रबोधनासाठी केवळ हिंदुत्वाच्या प्रचाराकरिता नव्हे, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव असतो, मग जरांगेंना मुंबईला आंदोलन करण्यास मज्जाव का करण्यात येत होता. हा डिजे आणि नाचगाण्याचा, मनोरंजनासाठीचा सण नाही. जागृती आणि प्रबोधनासाठी आंदोलन झाले तर कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची असते, ती राज्याचे गृहखाते टाळत होते. म्हणूनच सरकारला जरांगे मुंबईत येणे परवडणारे नव्हते. त्यासाठी त्यांनी मंत्री विखे यांना वेळोवेळी पुढे केले, पण त्यांनी हात टेकले आणि चर्चा बंद, असा पवित्रा घेतला, पण शेवटी त्यांना चर्चा करण्याची नामुष्की पत्करावी लागली, ही सर्वात मोठी पिछेहाट आहे, हे मुख्यमंत्र्यांना माहित होते, म्हणून मंत्री चंद्रकांत पाटील ऐवजी मंत्री विखेंना तोफेच्या तोडी दिले, हाच याचा अन्वयार्थ निघतो.

**- रामदास ढमाले (ज्येष्ठ पत्रकार)**

# अरणगाव रोडवर गॅरेजचे पत्रे कापून साहित्यांची चोरी

नगर - शहरात चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, अरणगाव रोडवर अजय गॅस गोडावून शेजारी एका दुचाकी दुरुस्तीच्या गॅरेजचे पत्रे कापून आत प्रवेश करत चोरट्यांनी २४ हजार रुपयांचे विविध साहित्य लंपास केले आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तुकाराम आप्पासाहेब काळे (वय ४८, रा. श्रीराम कॉलनी, केडगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे अरणगाव रोडवरील अजय गॅस गोडावून शेजारी 'ओमसाई' नावाचे दुचाकी दुरुस्तीचे गॅरेज आहे. १६ सप्टेंबर रोजी रात्री दहा ते १७ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने गॅरेजच्या वरचे पत्रे कापून आत प्रवेश केला.

चोरट्यांनी दुकानातून १० हजार रुपये किमतीच्या तीन इँको कंपनीच्या नट बोल्ट खोलण्याच्या मशिन, २ हजार रुपये किमतीचे एक गज कापण्याचे ग्राइंडर मशिन, १० हजार रुपये किमतीचे कॅस्ट्रॉल व होंडा कंपनीचे ९०० मिली वजनाचे २० ऑइलचे डबे आणि २ हजार रुपये किमतीची दोन शाईन कार्बोरेटर मशिन असा एकूण २४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

सकाळी गॅरेज उघडल्यानंतर हा प्रकार लक्षात आल्याने तुकाराम काळे यांनी तत्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## मारुतीराव पवार यांचे दु:खद निधन




नगर - चिचांडी पाटील येथील रहिवासी मारुती पाराजी पवार (वय ८५) यांचे १८ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजु पवार, आबा पवार यांचे ते वडील होत.

## मुकुंद कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - करमाळा तालुक्यातील कोंढेज येथील मूळ रहिवासी व सध्या येथील जुन्या कोर्टगल्ली भागात राहत असलेले मुकुंद त्र्यंबक कुलकर्णी (वय ८३, कोंढेजकर) यांचे १८ सप्टेंबर रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक मुलगा प्रसाद, तीन मुली राणी संतोष जगदाळे, संध्या धनेश जगदाळे, दिपाली शशिकांत टोले, सून रुपाली प्रसाद कुलकर्णी, नातवंडे, नाती, पतवंडे असा परिवार आहे. ते धार्मिक प्रवृत्तीचे होते. ते खाजगी नोकरीत होते. त्यांनी सुरूवातीच्या काळात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून आपल्या कुटुंबाला सावरले.

## सावित्री दोमल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - प्रेमदान हडको सावेडी येथील रहिवासी सौ. सावित्री देविदास दोमल (वय ६३) यांचे १७ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संजू दोमल व अनिल दोमल यांच्या त्या मातोश्री होत.

## कल्पनाताई तोगे यांचे निधन


नगर - माळीवाडा येथील रहिवासी कल्पना विकास तोगे (वय ६५) यांचे १५ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, २ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. गंजबाजार येथील गणेश किराणा स्टोअर्सचे बाळासाहेब लांभाते, विनायक लांभाते यांच्या त्या बहिण होत.

## देवीचंद नहार यांचे अल्प आजाराने निधन

पुणे - पहिला मजला, आनंदभवन, कल्याण प्रतिष्ठान, चिंचवडगाव पुणे येथील रहिवासी देवीचंद ताराचंद नहार (टेंभूर्णीवाला) (वय ७८) यांचे १७ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिंचवडगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अभय, प्रदीप, ज्योती दुगड यांचे ते वडील होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# 'श्री विशाल गणेश मंदिर'तर्फे २० सप्टेंबरला महिलांचे सामुहिक 'अथर्वशीर्ष' आणि महाआरती सोहळा

नगर - शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानच्यावतीने गणेशोत्सानिमित्त २० सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वा. महिलांचे सामुहिक अथर्वशीर्ष पठण व महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. अथर्वशीर्षची ११ अवर्तने केली जाणार आहेत. यावेळी २१ महिलांकडून शंखनाद केला जाणार आहे. त्यानंतर उपस्थित सर्व महिलांच्यावतीने ग्रामदैवत श्री विशाल गणपतीची सामुहिक आरती केली जाणार आहे.

या अथर्वशीर्ष पठणाचे यंदाचे सातवे वर्ष असून, सुरुवातीपासून या कार्यक्रमास महिलांचा प्रतिसाद मिळत आहे. असंख्य महिला एकत्रित सामुहिक अथर्वशीर्ष पठण करतात. यामध्ये युवती-महिला सहभागी होऊ शकतात. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नावनोंदणी नाही. महिलांनी लाल रंगाच्या मराठमोळ्या पेहरावात येणे अपेक्षितत आहे. प्रथम येणार्यास प्रथम प्राधान्य राहील.

हा कार्यक्रम अहिल्यानगरची एक सांस्कृतिक ओळख निर्माण व्हावी व मराठी संस्कृतीचे आणि परंपरेचे दर्शन, यासाठी देवस्थान ट्रस्ट प्रयत्नशील असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर यांनी सांगितले.

महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे कार्यक्रम श्री विशाल गणेश मंदिर प्रागंण, माळीवाडा, अहिल्यानगर या ठिकाणी होईल.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करताना डीजे व साऊंड व्यावसायिकांसह ऑपरेटर व कामगार.

# डीजेवरील बंदी उठविण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू

नगर - डीजे व ध्वनिर्वधक यंत्रणेवरील सरसकट आणि अवाजवी बंदी व निर्बंध हटवून, शासनाने निश्चित केलेल्या नियम व वेळेच्या मर्यादेत डीजे वाजवण्यास परवानगी देण्यात यावी, या मागणीसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील डीजे असोसिएशनचे सदस्य, स्पंदन उद्योग समूह, सागर कचरे यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे.

याबाबत स्पंदन उद्योग समूह, सागर कचरे आणि साऊंड लाईट जनरेटर असोसिएशन यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात संघटनेच्यावतीने विविध मागण्या करण्यात आल्या होत्या. संघटनेच्या मागण्या मान्य न झाल्यास १८ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार १८ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे उपोषण करण्यात आले. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, डीजे व ध्वनिर्वधक यंत्रणेवर लादण्यात आलेल्या सरसकट व अवाजवी निर्बंधांमुळे डीजे व्यवसायावर अवलंबून असलेल्या असंख्य व्यावसायिक, चालक, ऑपरेटर, कामगार व त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने ध्वनीप्रदूषणाबाबत निश्चित केलेले नियम, ध्वनीची मर्यादा व निर्धारित वेळेचे पालन करण्यास व्यावसायिक पूर्णपणे तयार आहेत. मात्र नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांवर सरसकट बंदी किंवा अन्यायकारक कारवाई करणे योग्य नसल्याचे यात म्हटले आहे.

डीजे व ध्वनिर्वधक यंत्रणेवरील सरसकट बंदी व अनावश्यक निर्बंध तात्काळ हटवण्यात यावेत. शासनाने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादा व वेळेच्या नियमांचे पालन करून डीजे वाजवण्यास परवानगी देण्यात यावी. डीजे वाजवण्यासाठीची परवानगीची स्पष्ट, सुलभ व पारदर्शक प्रक्रिया प्रशासनाने जाहीर करावी. नियमांचे पालन करणाऱ्या डीजे व्यावसायिकांवर विनाकारण अथवा भेदभावपूर्ण कारवाई करण्यात येऊ नये. डीजे व्यवसायावर अवलंबून असलेल्या १ ते २.५ लाख कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, असे या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर मंगेश घोडके, नय्युमभाई शेख, सचिन कराळे, प्रशांत मोटे, दीपक साळके, युवराज भागवत, नितीकेश थेटे आदींची नावे आहेत.

# गणेशोत्सव काळात अखंड वीजपुरवठा द्या

**सायंकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत भारनियमन टाळण्याची मागणी; खा. नीलेश लंके यांचे ऊर्जा विभागाला निर्देश**



नगर - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण तसेच शहरी भागात नागरिकांना अखंड, सुरळीत आणि योग्य दाबाने वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाकडे केली आहे. याबाबत त्यांनी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र पाठवून महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने स्पष्ट निर्देश देण्याची मागणी केली आहे.

गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून शहरांबरोबरच ग्रामीण भागातील गावठाणे, वाड्या-वस्त्यांमध्येही विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळच्या वेळेत नागरिक मोठ्या संख्येने आरती व अन्य कार्यक्रमांसाठी एकत्र येतात. अशा वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांची गैरसोय होत असल्याचे खासदार लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील विविध भागांत वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीजपुरवठा होणे, भारनियमन करणे तसेच सिंगल फेज बंद होणे, अशा तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत असल्याचे त्यांनी सांगितले. काही ठिकाणी वीज उपलब्ध असतानाही 'वरून वीजपुरवठा बंद करण्याचे आदेश आहेत', असे कारण सांगितले जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

गणेशोत्सवाच्या उर्वरित कालावधीत विशेषतः सायंकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत अनावश्यक भारनियमन अथवा वीजपुरवठा खंडित करू नये. कमी दाबाने वीजपुरवठा होणे आणि वारंवार वीजखंडित होण्याच्या समस्या तातडीने दूर करण्यासाठी महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

गणेशोत्सव काळात नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी अखंड, सुरळीत आणि योग्य दाबाने वीजपुरवठा सुनिश्चित करण्याची कार्यवाही तातडीने करावी, अशी विनंती त्यांनी ऊर्जा विभागाकडे केली आहे. या पत्राची प्रत महावितरणच्या अहिल्यानगर परिमंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांनाही देण्यात आली असून आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

# नगर-मनमाड रस्त्यावरील खड्ड्यांत दिवे लावून अनोखे आंदोलन

**पंतप्रधानांच्या 'घराघरात दिवे लावा' आवाहनाचा संदर्भ देत भाजप सरकारचा निषेध; रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मागणी**

नगर - नगर-मनमाड रस्त्याची गेल्या पाच ते सात वर्षांपासून झालेली दुरवस्था, जागोजागी पडलेले खड्डे आणि अपघातांचा वाढता धोका याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'घराघरात दिवे लावा' या आवाहनाचा संदर्भ घेत कार्यकर्त्यांनी नगर-मनमाड रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये दिवे लावून भाजप सरकारचा निषेध व्यक्त केला.



नगर-मनमाड रस्त्याची गेल्या पाच ते सात वर्षांपासून झालेली दुरवस्था, जागोजागी पडलेले खड्डे आणि अपघातांचा वाढता धोका याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे अनोखे आंदोलन करण्यात आले.

नगर-मनमाड हा शिर्डी येथील साईबाबांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसह स्थानिक नागरिक, शेतकरी आणि व्यावसायिकांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, या रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली असून, खड्डे, धुळीचे साम्राज्य आणि अपुऱ्या देखभालीमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून, अनेक कुटुंबांवर दुःखाचे प्रसंग ओढवले आहेत. त्यामुळे शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, नागरिकांना घरात दिवे लावण्याचे आवाहन करण्यापेक्षा सर्वप्रथम नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यांवरील खड्डे बुजवून विकासाचे दिवे लावणे गरजेचे आहे. नगर-मनमाड रस्त्याची दुरुस्ती केवळ आश्वासनांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात झाली पाहिजे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अतर खान, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत ससाने, नगर तालुकाध्यक्ष शरद पवार, विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, कार्याध्यक्ष अजहर शेख, दत्तात्रय डोकडे, फारूक रंगरेज, समीर पठाण, परवेज शेख, आरिफ पटेल, गणेश तोडमल, राम झीने यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## रस्त्याची दुरुस्ती कधी होणार?

नगर-मनमाड रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिक त्रस्त झाले आहेत. शिर्डीकडे जाणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गाची तातडीने दुरुस्ती करून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी. शासनाने या प्रश्नावर ठोस निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे यांनी केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### करा सर्दी खोकल्या पासून बचाव

बदलत्या हवामानामुळे सर्दी खोकला होणे ही आता सामान्य समस्या झाली आहे. थंडी, पाऊस किंवा धुळीमुळे अनेकांना घसा दुखणे, नाक बंद होणे आणि सतत खोकला येणे असा त्रास होतो. अशा वेळी लगेच बाहेरचे औषध घेण्यापेक्षा घरातच तयार केलेला आयुर्वेदिक काढा खूप फायदेशीर ठरतो. हा काढा कोणत्याही दुष्परिणामाशिवाय शरीराला आतून बरे करतो. हा काढा बनवण्यासाठी लागणारे साहित्य आपल्या स्वयंपाक घरातच मिळते. त्यासाठी ताजी तुळशीची बारा ते पंधरा पाने, अर्धा इंच आले, पाच ते सहा काळी मिरी, दालचिनीचा एक छोटा तुकडा, दोन लवंगा, दोन चमचे मध किंवा छोटा गुळाचा खडा आणि दोन वाट्या पाणी एवढे साहित्य लागते. तुळस ही नैसर्गिकरित्या जंतूनाशक असते तर आले आणि काळी मिरी उष्णता निर्माण करून कफ बाहेर काढण्यास मदत करतात. काढा बनवण्याची पद्धत अतिशय सोपी आहे. प्रथम एका पातेल्यात दोन वाट्या पाणी घ्यावे. पाणी थोडे गरम झाल्यावर त्यात तुळशीची पाने हाताने तोडून टाकावीत. त्यानंतर त्यात किसलेले आले, ठेचलेली काळी मिरी, दालचिनीचा तुकडा आणि लवंगा टाकाव्यात. हे मिश्रण मंद आचेवर दहा ते पंधरा मिनिटे उकळू द्यावे. पाणी निम्मे होईपर्यंत उकळल्यावर गॅस बंद करून त्यात गुळ किंवा मध टाकावा. नंतर हे पाणी गाळून कोमट असतानाच प्यावे. हा काढा सकाळी अनशापोटी आणि रात्री झोपण्यापूर्वी दोन वेळा घेतल्यास दोन ते तीन दिवसात उत्तम आराम मिळतो. लहान मुलांना देताना काढ्याचे प्रमाण अर्धी वाटी ठेवावे आणि मिरीचे प्रमाण कमी करावे. काढा घेत असताना काही पथ्य पाळणे गरजेचे आहे.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### बाउंटी मोदक

**साहित्य :** वाळलेले खोबरे किसलेले २ वाटी, मिल्कमेड १/२ वाटी, पिठी साखर १/४ वाटी, व्हॅनिला इसेन्स १/२ चमचा, डार्क चॉकलेट २०० ग्रॅम, पांढरे चॉकलेट ५० ग्रॅम, सजावटीसाठी बदाम काप १ चमचा, मोदकाचे साचे

**कृती :** एका भांड्यात किसलेले खोबरे, मिल्कमेड, पिठी साखर आणि व्हॅनिला इसेन्स घालून मिश्रण एकजीव करा. हे मिश्रण मध्यम आचेवर दोन ते तीन मिनिटे परतून घ्या म्हणजे गोळा तयार होईल. मिश्रण थंड होऊ द्या. दुसरीकडे डार्क चॉकलेट बारीक तुकडे करून डबल बॉयलरवर वितळवून घ्या. मोदकाच्या साच्याच्या आत चमच्याने वितळलेले चॉकलेट सर्व बाजूने लावा आणि पाच मिनिटे फ्रिजमध्ये सेट होऊ द्या. आता त्यात तयार खोबऱ्याचे सारण दाबून भरा. वर पुन्हा वितळलेले चॉकलेट घालून बंद करा. तयार मोदक दहा मिनिटे फ्रिजमध्ये ठेवा. साच्यातून काढून वर पांढऱ्या चॉकलेटने रेषा ओढा आणि बदाम कापाने सजवा.

## वास्तू

### तुळशी संबंधी...

* तुळस नेहमी गोल किंवा चौकोनी उंचवट्यावर लावावी, जमिनीवर थेट लावू नये.

* तुळस अंगणाच्या मध्यभागी किंवा अंगणाच्या ईशान्य कोपऱ्यात लावावी.

* तुळशीची कुंडी कधीही काळ्या किंवा निळ्या रंगाची वापरू नका, लाल किंवा पिवळ्या रंगाची उत्तम. रविवारी, एकादशीला आणि संध्याकाळनंतर तुळशीची पाने तोडू नयेत.

## सौंदर्य

* रात्री झोपताना कोरफड गरात थोडे गुलाब पाणी मिसळून ओठांवर लावावे. फाटलेले ओठ बरे होऊन गुलाबी होतात.

* रोज ताजी कोरफड वापरणे जास्त फायदेशीर असते. रासायनिक जेल पेक्षा घरची कोरफड जास्त गुणकारी ठरते.

## सल्ला

आले-लसूण पेस्ट करताना थोडे मीठ आणि तेल टाका, महिनाभर फ्रिजमध्ये खराब होत नाही. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६

**दुर्गाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, मूळ २५।४३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज दिवस धावपळीचा राहील. जुन्या मित्राची भेट होईल.

**वृषभ :** धनलाभाचे योग आहेत. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**मिथुन :** कामात यश मिळेल. प्रवासाचा योग जुळून येईल.

**कर्क :** मन थोडे अस्वस्थ राहील. घरातील वातावरण शांत राहील.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल. नवीन कामाची सुरुवात होईल.

**कन्या :** खर्चात वाढ होईल. आरोग्याची काळजी घ्यावी लागेल.

**तुळ :** अडकलेले काम पूर्ण होईल. जोडीदाराची साथ मिळेल.

**वृश्चिक :** महत्त्वाची बातमी मिळेल. नोकरीत बदल संभवतो.

**धनु :** दिवस चांगला जाईल. इच्छा पूर्ण होईल.


**मकर :** कामाचा ताण वाढेल. जवळच्या व्यक्तीशी मतभेद होतील.

**कुंभ :** आर्थिक स्थिती सुधारेल. नवीन ओळखी होतील.

**मीन :** मन प्रसन्न राहील. मुलांकडून चांगली बातमी मिळेल.

## शब्दगंध क्र. ७५१९

सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) मोठा; शक्तिमान; जास्त ५) अधर्म; पातक ७) बंदुकीची दारू; मोठा आवाज ८) सहा ऋतूंपैकी एक १०) एकसारखे बोलणे; बडबड; वटवट ११) काख १३) चावण्याचा अवयव; दंत १४) पांघरण्याचे एक वस्त्र १५) खाण्यासाठी घेतलेला अन्नाचा गोळा १७) उपवन; उद्यान; बगीचा १८) अंगाला शेंदूर फासून मरीआईच्या नावाने भिक्षा मागणारा २०) वीस दस्ते कागद २२) पाढ्यातील सहाची संज्ञा २३) सटसटीत एकेरी अंगाचा; काटकोळा २५) गळ्यात तुळशीची माळ घालणारा (वारकरी)

**उभे शब्द :-** १) उत्तरदायित्व; जिम्मेदारी २) यशस्विता; भरभराट ३) दहांचा समुदाय ४) थर; दर्जा ६) पाणी वाहून नेण्याची कापडी पट्टी ९) आदरयुक्त दरारा १२) अगदी गोल; वाटोळा १५) समान संख्यांचा गुणाकार १६) साधारण; मध्यम; ॲव्हरेज; वरवर; अंदाजाने १८) रिकामा; रिता; भरीव नसलेला १९) वजनदार; मंद बुद्धीचा; आळशी २१) मळालेला २२) पूर्ण भरतीची वेळ २४) घोडे बांधण्याची जागा; घोडशाळा

### शब्दगंध क्र. ७५१८ चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. १२५४ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** जग तुमच्यावर तेव्हाच विश्वास ठेवेल जेव्हा तुम्ही स्वतःवर ठेवाल.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मोबाईल चार्जिंगला लावून वापरला तर स्फोट होतो का?

आजच्या काळात मोबाईल हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण मोबाईलचा वापर करत असतो. सोशल मीडिया, ऑनलाईन शिक्षण, गेम्स, व्हिडीओ कॉल आणि मनोरंजन यामुळे दिवसभरात बॅटरी लवकर संपून जाते आणि मग अनेकजण मोबाईल चार्जिंगला लावूनच वापरतात. अशावेळी प्रत्येकाच्या मनात एकच भीती असते की चार्जिंग चालू असताना मोबाईल वापरल्याने त्याचा स्फोट होईल का? खरे तर चांगल्या आणि विश्वासू कंपनीचा मोबाईल आणि त्या मोबाईल सोबत मिळालेला मूळ चार्जर वापरत असाल तर चार्जिंगला लावून मोबाईल वापरल्याने थेट स्फोट होत नाही.

आजच्या आधुनिक स्मार्टफोनमध्ये लिथियम आयन बॅटरी वापरली जाते आणि या बॅटरीमध्ये ओव्हर चार्ज प्रोटेक्शन, तापमान नियंत्रण आणि ऑटो कट ऑफ सारखी आधुनिक सुरक्षा यंत्रणा असते. त्यामुळे बॅटरी शंभर टक्के चार्ज झाली की आपोआप वीजपुरवठा बंद होतो. परंतु याचा अर्थ असा नाही की चार्जिंगला लावून मोबाईल वापरणे पूर्णपणे सुरक्षित आहे.

जेव्हा आपण मोबाईल चार्जिंगला लावतो तेव्हा बॅटरीमध्ये रासायनिक प्रक्रिया सुरू होऊन ती गरम होऊ लागते आणि त्याच वेळी आपण त्यावर मोठा गेम खेळणे, जास्त वेळ व्हिडीओ पाहणे किंवा व्हिडीओ कॉल करणे असे जड काम केले तर प्रोसेसरवर देखील ताण येतो. म्हणजेच एकाच वेळी बॅटरी चार्ज होत असते आणि डिस्चार्जही होत असते. यामुळे फोनचे तापमान सामान्य पेक्षा दुप्पट वाढते. या सततच्या गरम होण्याला थर्मल रनअवे असे म्हणतात. रोज असे केल्याने बॅटरीची क्षमता हळूहळू कमी होते, बॅटरी फुगायला लागते आणि मोबाईल हँग होण्याचे प्रमाण वाढते. मोबाईल स्फोट होण्यामागे चार्जिंगला लावून वापरणे हे एकमेव कारण नसून त्यामागे अनेक कारणे आहेत. बाजारात मिळणारे स्वस्त लोकल चार्जर आणि केबल वापरणे हे सर्वात मोठे कारण आहे कारण अशा चार्जरमध्ये व्होल्टेज नियंत्रित करण्याची यंत्रणा नसते. त्याचबरोबर रात्रभर मोबाईल चार्जिंगला लावून उशीखाली ठेवून झोपणे, चार्जिंग चालू असताना मोबाईलचे जाड कव्हर न काढणे ज्यामुळे उष्णता बाहेर पडत नाही, बॅटरीला मार लागलेला असणे किंवा फुगलेली बॅटरी असूनही त्याच मोबाईलचा वापर करणे आणि चार्जिंग सॉकेट मध्ये लूज कनेक्शन असणे ही स्फोटाची खरी कारणे आहेत. अनेकवेळा आपण मोबाईल चार्जिंगला लावून उन्हात किंवा गाडीच्या डॅशबोर्डवर ठेवतो तेव्हाही धोका वाढतो. त्यामुळे स्फोट टाळण्यासाठी काही साध्या सवयी लावून घेणे गरजेचे आहे.

शक्यतो मोबाईल वीस टक्क्याच्या खाली गेल्यावरच चार्जिंगला लावावा आणि ऐंशी ते नव्वद टक्के पर्यंत चार्ज झाल्यावर काढून टाकावा. चार्जिंगच्या वेळी जड गेम्स खेळणे टाळावे, नेहमी कंपनीचाच ओरिजनल चार्जर वापरावा, मोबाईल जास्त गरम होत असेल तर थोडा वेळ चार्जिंग बंद करून त्याला थंड होऊ द्यावे आणि रात्रभर चार्जिंगला लावून ठेवू नये. एवढी छोटीशी काळजी जरी घेतली तरी तुमचा मोबाईल वर्षानुवर्षे सुरक्षित राहील, बॅटरीचे आयुष्य वाढेल आणि स्फोटासारख्या गंभीर अपघातापासून तुम्ही दूर राहाल.

### झाडे लावा, झाडे जगवा


एका गावात एक मोठा मळा होता. त्या मळ्यात खूप आंब्याची, चिंचेची आणि वडाची झाडे होती. पण त्याच गावात बंडू नावाचा एक मुलगा राहत होता, त्याला झाडांचा खूप राग यायचा. झाडांमुळे कचरा होतो म्हणून तो रोज एक तरी फांदी तोडायचा. लोकांनी त्याला खूप समजावले पण तो ऐकत नसे.एकदा गावात खूप मोठा दुष्काळ पडला. पाऊसच पडेनासा झाला. सगळ्या विहिरी, तळी आटून गेली. शेतातील पिके सुकून गेली. गावात पिण्याच्या पाण्यासाठी देखील लोकांना मैलो-मैल चालावे लागत होते. प्रचंड उन्हामुळे सगळे हैराण झाले होते. सावलीसाठी सुद्धा झाड उरले नव्हते कारण लोकांनी गरजेपोटी अनेक झाडे तोडली होती.

बंडूच्या घराजवळ एकच मोठे वडाचे झाड शिल्लक होते. त्या झाडाखाली गावातील सगळी माणसे, गुरे-ढोरे उन्हापासून वाचण्यासाठी येत असत. बंडूने पाहिले की ज्या झाडांचा आपण राग करायचो तेच झाड आज सगळ्यांना आधार देत आहे. त्याच रात्री त्याला एक स्वप्न पडले. त्यात सर्व झाडे त्याच्याशी बोलत होती.

एक झाड म्हणाले, बंडू, तू आम्हाला तोडतोस, पण आम्ही तुला काय देतो माहित आहे का? आम्ही तुला फळे देतो, सावली देतो, पाऊस पाडायला मदत करतो, हवा शुद्ध करतो. दुसरे झाड म्हणाले, आम्ही नसलो तर माणूस जगूच शकणार नाही.बंडू घाबरून जागा झाला. त्याला आपली चूक कळली. दुसऱ्या दिवसापासून त्याने ठरवले. त्याने गावातील सर्व मुलांना गोळा केले आणि प्रत्येकाने पाच-पाच झाडे लावायची मोहीम सुरू केली. त्याने लावलेल्या छोट्या रोपांना रोज पाणी घालणे, त्यांचे जतन करणे सुरू केले. काही वर्षातच गावाचे रूपच बदलून गेले. जिकडे तिकडे हिरवीगार झाडे झाली. पाऊस चांगला पडू लागला, विहिरींना पुन्हा पाणी आले, पक्षी परत आले. गाव पुन्हा सुखी झाले. तेव्हा गावच्या सरपंचांनी बंडूचा सत्कार केला आणि त्याला वृक्षमित्र ही पदवी दिली.

तात्पर्य : झाडे हीच आपली खरी संपत्ती आहेत. झाडे लावणे म्हणजे जीवन लावणे, म्हणून झाडे लावा आणि झाडे जगवा.

## आत्मशक्ति



### प्रकाशाचा अनुभव

आमच्या आत्म्याच्या बाबतीत असे घडते. अनेक सूर्यांच्या एकत्रित प्रकाशापेक्षा अधिक प्रकाश एकट्या आमच्या आत्म्याचा असतो. परंतु तो काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार ह्यांच्या आवरणाने झाकला गेल्यामुळे आज आम्ही त्याचा तितका प्रकाश अनुभवत नाही. आत्मा मूलतः प्रेममय आहेपरमात्मा म्हणजे प्रेम. आत्मा हा परमात्म्याचा अंश असल्याने तोही प्रेमस्वरूपच आहे. जेथे प्रेम तेथे हिंसेचे व क्रोधाचे काय काम ? जेथे प्रेम तेथे अविश्वास, धोकेबाजी आणि खोटेपणाचा लवलेश राहत नाही.

तेथे लोभ आणि स्वार्थ असणार नाही. तेथे अहंकाराचा प्रवेश नाही. जेथे पावित्र्य आहे, तेथे वासनेचा उदय होतच नाही. जर एखाद्या नाते संबंधात यापैकी एखादा दुर्गुण डोकावला, तर प्रेम कमी होते. आत्म्यावर कुकर्माचे आवरण चढले की आमचे लक्ष चेतन अवस्थेपासून दूर होत जाते.आम्ही एखाद्यावर अंतःकरणापासून अपार प्रेम करतो, त्या स्थितीचा विचार करा! असे प्रेम मायलेक, मित्र, पतीपत्नी अथवा प्रणयी युगलांमध्ये असू शकते. आम्ही जेव्हा अशा व्यक्तीवर प्रेम करतो. तेव्हा त्यांना दुःख होईल असे करण्याचा विचार तरी करतो का ? त्यांच्याशी आपण कधी खोटे बोलतो का ? स्वार्थ आणि लोभापायी आपण त्यांना त्यांच्या जरूरीच्या वस्तू देण्याचे टाळतो ? या सर्वांचे उत्तर 'नाही' असेच येते आणि म्हणून आम्ही सर्वांवर असेच प्रेम करावे व अशाच आपुलकीने वागावे.

असे केल्याने आमच्या आत्म्यावरील आवरणे गळून पडतील व तो चमकतांना दिसेल. असीसीच्या संत फ्रान्सिस ह्यांनी एक सुंदर प्रार्थना केली आहे. जागृत आत्मा कसे जीवन जगतो, हे सारांशरूपाने त्यात सांगितले आहे परमेश्वरा! आपल्या शांतीचे मला साधन बनवा. जेथे द्वेष असेल तेथे प्रेमाची पेरणी करू द्या. जेथे घातपात होतो तेथे क्षमा, जेथे अविश्वास तेथे विश्वास, जेथे निराशा तेथे आशा, ह्यांची बरसात करू द्या. जेथे अंधार तेथे प्रकाश, जेथे खिन्नता तेथे आनंद वाढू द्या. माझ्या दिव्य गुरुवर्या, मला दान द्या की मी कोणाची सांत्वना घेऊ नये परंतु इतरांचे सांत्वन करू शकेल. इतरांना समजावून घेण्याचे स्वतःचाच विचार न करण्याचे वरदान द्या. (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आत्मा

शिक्षा, टीका, संताप किंवा अपमान यांचा वापर आपण करता कामा नये कारण त्यामुळे ती व्यक्ती स्वाभिमान गमावेल. या छोट्या छोट्या गोष्टींची काळजी घेतली तर प्रेमळ होण्याचा हा प्रवास आनंददायक बनेल.

सुरेश ओबेरॉय : जेव्हा मी माझ्या बायकोवर टीका करतो, तेव्हा मी तिच्यावर प्रेम करत नाही का?

शिवानीदीदी : प्रत्येक आत्मा सहज भावनेतून प्रेमच प्रसारित करत असतो पण ज्या क्षणी तो टीका करतो त्या क्षणी प्रेमाच्या ऊर्जेत अडथळा येतो. तुम्ही एकाच वेळी एखाद्यावर प्रेम आणि टीका दोन्हीही करू शकत नाही. तुमच्या दिवसाची सुरुवात उदासवाणी झालेली असतानाही 'गुड मॉर्निंग' म्हणण्यासारखं आहे हे. प्रेम ही आत्म्याची सहज ऊर्जा आहे. त्यामुळे ते व्यक्त, प्रकट होण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या प्रयत्नांची आवश्यकता नाही.

सुरेश ओबेरॉय : हा उत्तम विचार आहे. ह्या विचारावर ध्यान करू या.ध्यान आणि चिंतनजी शक्ती या शरीराला चालवत आहे... सुंदर व प्रेमळ ऊर्जा, तो मी, आत्मा आहे जो विचार करतो आणि अनुभवतो... प्रेम हाच माझा नैसर्गिक संस्कार आहे... जेव्हा मला या मूळ संस्काराची जाणीव असते तेव्हा माझ्याकडून इतर आत्म्यांना प्रेम पाठवलं जातं... हा माझ्या प्रेमाचा गंध आहे...

जर कोणी चूक केली तर त्यावर माझं मत मांडण्याकडे किंवा प्रतिक्रिया देण्याकडे मी आज लक्ष देईन... मी उद्यासाठी सल्ला देईन... पण माझ्याकडून प्रेमाच्या प्रवाहात अडथळा येऊ देणार नाही... मी प्रेमळ अस्तित्वासह अभिप्राय देईन... लक्षात घ्या, मी एक प्रेमळ आत्मा आहे जो दुसऱ्या आत्म्याबरोबर बोलत आहे... ओम शांती!

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**पप्पू :** बाबा, लग्न म्हणजे काय?

**बाबा :** लग्न म्हणजे असं दुकान आहे जिथे प्रेमाची वस्तू आधी दाखवतात आणि नंतर बिल आयुष्यभर भरायला लावतात!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ युरोप आणि आफ्रिका खंडांना कोणता समुद्र वेगळा करतो?

– भूमध्य समुद्र

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### विवाह ठरल्यानंतर

नलिकेमध्ये येते. तो पर्यंत गर्भाशयामध्ये गर्भाच्या पोषणासाठी रक्ताचे अस्तर तयार होते. पती-पत्नीमध्ये प्रेमभावाने शारीरिक संबंध झाला की, म्हणजेच पत्नीच्या योनीमार्गामध्ये पतीच्या शिश्नाचा प्रवेश होऊन समागम झाल्यानंतर गर्भाशय मुखाजवळ पतीचे वीर्य पडते. वीर्यामधील काही शुक्रजंतू गर्भाशयात जाऊन बीज-वाहिनी नलिकेपर्यंत पोहोचतात. त्यातील एक ॲक्टीव शुक्रजंतूंचा स्त्रीबीजाशी संयोग होतो. त्यालाच फलन असे म्हणतात. त्यातून पेशीसमूह तयार होतो. हा पेशीसमूह गर्भाशयाच्या अस्तरामध्ये रुजतो आणि गर्भधारणा होते. ही क्रिया साधारणपणे पाळीच्या १८ व्या दिवसांपर्यंत पूर्ण होते. समजा, गर्भधारणा झाली नाही तर महिन्याच्या शेवटी २८-३० व्या दिवशी पाळीच्या स्वरूपात योनीमार्गे स्त्रीबीज बाहेर पडते. ही झाली स्त्रियांमधील प्रजनन संस्थेविषयी माहिती.

पुरुषांमधील प्रजननसंस्थेविषयी जाणून घेताना दोन वृषणग्रंथी असतात. त्यामध्ये शुक्रजंतूंची पूर्ण वाढ होण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागतो. शुक्रजंतूंचे प्राकृत प्रमाण ४०-१२० मिलीअन्स असते. हे शुक्रजंतू शारीरिक संबंधानंतर शुक्रवाहक नलिकेतून वीर्यासोबत स्त्रीच्या गर्भाशयाच्या मुखाशी योनीमध्ये पडतात. अशा प्रकारे पोस्टरद्वारे मी त्यांना गर्भाशय, योनीमार्ग, स्त्री-बीजकोष, पुरुषांचे जननेंद्रिय यांची माहिती दिली. शास्त्रोक्त माहिती दिल्यामुळे तेही शांतपणे व उत्सुकतेने ऐकत होते. मनमोकळेपणाने निःसंकोचपणे प्रश्न विचारीत होते.

यानंतर गौरवने मला विचारले की, ''डॉक्टर, तुम्ही आम्हाला ही माहिती खूप चांगली सांगितलीत; परंतु आम्हाला शारीरिकसंबंध जमेल का? मी तिचे समाधान करू शकेन का?'' असे गौरवने विचारल्यावर शारीरिकसंबंध ही अगदी नैसर्गिक गोष्ट आहे. सुरुवातीला प्रथम समागमाच्या वेळी स्त्रीच्या योनीमध्ये असणारा पडदा फाटून थोडासा रक्तस्राव, योनीभागी जळजळ होणे असा त्रास होऊ शकतो. प्रत्येकालाच होईल असे नाही. त्रास झाला तरी घाबरून जाऊ नये. **(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ऊस गाळप हंगामाची पूर्व बैठक तातडीने घेण्यात यावी; शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी उपाययोजना करा

### नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरमध्ये गाळप सुरू करा : अभिजीत पोटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नगर – सन २०२६–२७ च्या ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मागील हंगामातील त्रुटी, ऊस दरातील अनियमितता आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली ऊस गाळप हंगाम पूर्व बैठक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे शिवसैनिक तथा ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजीत अशोकराव पोटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी संजय वाघ आदी उपस्थित होते. तसेच त्यावर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुढील आठवड्यात बैठक घेण्याचे आश्वासन दिले.



शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली ऊस गाळप हंगाम पूर्व बैठक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी शिवसैनिक अभिजीत पोटे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सन २०२३ च्या ऊस गाळप हंगामात श्रीगोंदा येथील कुंडलिकराव जगताप सहकारी साखर कारखान्याने जास्तीचा ऊस दर सांगून शेतकऱ्यांचा ऊस तोडून नेला. त्यानंतर जप्तीची कारवाई निघाल्यावर केवळ एफआरपीप्रमाणे पैसे देण्यात आल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ७११ रुपयांचा तोटा सहन करावा लागल्याचा आरोप अभिजीत पोटे यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांना हंगाम पूर्व बैठकीस बोलावून योग्य ती चर्चा करून निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

सन २०२५–२६ च्या ऊस गाळप हंगामात काही साखर कारखान्यांनी साखर उतारा कमी दाखवून ऊस दर कमी दिल्याचा आरोपही पोटे यांनी केला. तसेच नियमांचे उल्लंघन करून जास्तीचा वाहतूक खर्च दाखविणे, साखर उताऱ्यातील तांत्रिक त्रुटी आणि त्यातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

#### ऑक्टोबरमध्ये गाळप सुरू करू नये

यंदा पर्जन्यमान कमी झाल्याने ऊस पिकाची अपेक्षित वाढ झालेली नाही. थंडीच्या काळात उसाची वाढ होऊन साखर तयार होण्याची प्रक्रिया वेग घेते, तसेच उसाचे वजनही वाढते. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये गाळप हंगाम सुरू केल्यास साखर उतारा कमी होऊन शेतकऱ्यांना कमी ऊस दर मिळण्याची शक्यता आहे. परिणामी, सन २०२६–२७ चा ऊस गाळप हंगाम नोव्हेंबरअखेर किंवा डिसेंबरमध्ये सुरू करण्यात यावा, अशी मागणी अभिजीत पोटे यांनी केली.

देशात साखरेचे भाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने ऊस गाळप हंगाम लवकर सुरू करण्याबाबत निर्णय घेतले आहेत. मात्र, त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसू नये यासाठी हंगाम सुरू होण्यापूर्वीच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान प्रतिटन १ हजार रुपये अनुदान जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

जिल्ह्यातील सर्व खाजगी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी आणि प्रादेशिक साखर कार्यालयातील संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन ठोस उपाययोजना निश्चित कराव्यात. या बैठकीतील धोरणात्मक निर्णयांची माहिती साखर आयुक्त आणि महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात यावी, यासाठी बैठक अत्यावश्यक असल्याचे पोटे यांनी स्पष्ट केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

### रागावून काय मिळणार?

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स





अनेकांचा आवडता छंद रागावणे. काय मिळविणे ? स्वतःचेच रक्त आटविणे जैन मुनी आचार्य शिवकोटी आपल्या भगवती आराधना ग्रंथात म्हणतात, अग्नीत लोखंडाचा गोळा लाल लाल होतो. स्वतःच आधी तापतो. तसाच रागावणारा आधी स्वतःच संतप्त होतो.

बरे, तो निदान दुसऱ्याला राग तरी आणील. ते त्याच्या हाती नसेल तर दुसरा कशाला रागावेल? कदाचित गालातल्या गालात हसेल. दुसऱ्याला राग आणणे, त्यापायी त्याला दुःखी करणे हे रागावणाऱ्याच्या स्वाधीन नसते. मग रागावून काय मिळविणे ? केवळ आपल्या अहंकाराला लाडावणे? कदाचित आपले ओरडणे, दातओठ खाणे, कपाळावर नाहक आठ्या पाडणे म्हणजे स्वत:चा चेहरा विद्रूप करून घेणे. रागावणे म्हणजे रुबाब वाढणे ? रागावणे म्हणजे इतरांवर दहशत बसविणे ? छे! हे भ्रामक समजणे. इतराना ते कवडीमोल वाटणे.

बा माणसा तू सतत रागावून बोलतोस. साधे सरळ प्रेमळ बोलणे का विसरतोस? तुझ्या या पोकळ रागावून बोलण्याला लोक भीक घालत नाहीत. तुझे भय बाळगीत नाहीत. तू म्हणशील तसे करायला तर मुळीच धजत नाहीत. उलट असलेला जिव्हाळा आटवून ते तुझे कुठलेही काम करीत नाहीत, तू ही तुझे रक्त आटवण्यापलीकडे काही साधत नाहीस. लोक त्यापायी दुरावतात. तुझे अकारण शत्रू होतात. तू मूर्ख म्हणून तुला हसतात. मग कशाला आपण आपल्याच शिरा ताणायच्या. दुसऱ्याच्या भल्यासाठी मी रागावतो असे म्हणतो, तो चूक करतो. आपल्या जिवाचा विचार कर. कशाला दुसऱ्याचा आपल्या डोक्यावर भार धरायचा? प्रत्येकाला आपले हित कळते. प्रत्येकजण आपल्या स्वार्थाला जपतो. मग तू रागावलास की तुझ्याशी त्यांचे खटकते. ते तुलाच दुःखात लोटते. वाटल्यास तू त्यांचे दोष दाखव, पण भाषेत ठेव लाघव. खालच्या सुरात बोलून काम साधायचे कौशल्य दाखव.

निवडणुकीला दोघे उभे राहिले. भाषणे ठोकत बसले. एक जिंकला. लोक म्हणाले, हरला, तो असेल खूप शिकलेला. पण आम्हाला टचकन बोलून बसला. म्हणाला, तुमच्यातले अर्धे लोक महामूर्ख आहेत. महामूर्ख म्हणणारा हा कोण शहाणा ? दुसराही तेच म्हणाला होता, पण वेगळ्या शैलीत. शहाणे आहेत. ते मला मते नक्की देतीलच.

– किशोर गांधी

# निंबळक येथे २० सप्टेंबर रोजी ‘होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा’

नगर – तालुक्यातील इसळक–निंबळक येथील रुद्रवंश युवा प्रतिष्ठानच्या वतीने यंदा सामाजिक भान जपत डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. मिरवणुकीवरील अनावश्यक खर्चाला फाटा देत महिलांसाठी खास ’होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या आगळ्या–वेगळ्या उपक्रमाचे सर्व पंचक्रोशीत कौतुक होत आहे.





रुद्रवंश युवा प्रतिष्ठान गेल्या १० वर्षांपासून अविरतपणे गणेशोत्सव साजरा करत आहे. यंदाचे हे ११ वे वर्ष आहे. राज्यभरात डीजे मुक्त सण–उत्सव साजरे करण्याची मोहीम सुरू असताना, या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत मंडळाने महिला सक्षमीकरण, सबलीकरण आणि मनोरंजनाला प्राधान्य दिले आहे. महिलांना एक व्यासपीठ मिळावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे महेश चव्हाण यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी निवेदक, सूत्रसंचालक उद्धव काळापहाड (के.पी.) हे ’होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा’ चे संयोजन करणार आहेत.

हा कार्यक्रम २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता इसळक–निंबळक येथे होणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन सुरळीत व्हावे यासाठी नावनोंदणी आवश्यक असून नावनोंदणी पूर्णपणे निःशुल्क ठेवण्यात आली आहे. कार्यक्रम वेळेतच सुरू होणार आहे. महिला आणि तरुणींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन रुद्रवंश युवा प्रतिष्ठानचे संकेत गुंजाळ यांनी केले आहे.

# ‘लोकसंवाद–२०२६’ अंतर्गत‘ श्री गणेशा आरोग्याचा’ अभियान

### आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

नगर – ‘गणेशोत्सव’ हा महाराष्ट्रातील लोकसहभागाचा मोठा उत्सव असून राज्य शासनाने या उत्सवाला ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केले आहे. गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच गावागावांत होणाऱ्या जनसमुदायाच्या उपस्थितीचा प्रभावी उपयोग करून शासनाचे धोरणात्मक निर्णय, विविध कल्याणकारी योजना आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभरात ‘लोकसंवाद–२०२६’ हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे.



‘श्री गणेशा आरोग्याचा’ आरोग्य अभियान–२०२६ अंतर्गत अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेज येथे मार्गदर्शनपर व्याख्यान तसेच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.


या उपक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या समन्वयाने ‘श्री गणेशा आरोग्याचा’ आरोग्य अभियान–२०२६ अंतर्गत अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेज येथे मार्गदर्शनपर व्याख्यान तसेच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा समन्वयक रोहित कारंडे यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. जिल्ह्यातील सुमारे ५२ टक्के नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढले असून उर्वरित पात्र नागरिकांनीही आयुष्मान कार्ड तसेच वय वंदना कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या योजनांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य उपचाराचा लाभ मिळू शकतो, अशी माहिती त्यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्यात या योजनेअंतर्गत १०७ खासगी रुग्णालये अंगीकृत असल्याचेही श्री. कारंडे यांनी सांगितले. त्यामुळे पात्र नागरिकांनी योजनांची माहिती घेऊन आवश्यक कागदपत्रांसह कार्ड काढून घ्यावे आणि उपलब्ध आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी ‘लोकसंवाद–२०२६’ या उपक्रमाचा उद्देश आणि त्याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. शासनाच्या विविध योजना व निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारा लोकसहभाग महत्त्वाचा ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आयोजित मोफत आरोग्य शिबिराचा नागरिकांनी लाभ घेतला. कार्यक्रमास अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेजचे अध्यक्ष डॉ. भूषण अनभुले, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, प्राचार्य डॉ. पवार, जिल्हा समन्वयक डॉ. स्वप्नील तुपे यांच्यासह संबंधित अधिकारी, पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

# मुद्गल पुराणानुसार पहिला गणेश अवतार वक्रतुंड !!



वेगवेगळ्या पुराणानुसार श्री गणेशाचे वेगवेगळे अवतार सांगितलेले आहेत ज्यात मुद्गल पुराण गणेशाच्या आठ अवतारांचे वर्णन करते तर गणेश पुराणाच्या परंपरेनुसार चार युगांसाठी चार प्रमुख अवतार सांगितले जातात.

मुद्गल पुराणातील अष्टावतारापैकी पहिला अवतार ‘वक्रतुंड’ हा मानला जातो. हा अवतार प्रामुख्याने मानवी मनातील ‘मत्सरासुर’ (मत्सर, ईर्ष्या) या आसुरी प्रवृत्तीच्या विसर्जनासाठी झाला.

एकदा देवराज इंद्राच्या मनात स्वतःच्या स्वर्गाधिपती पदाचा, रूपाचा आणि अफाट वैभवाचा अतिरेकी गर्व निर्माण झाला. या गर्वातून पुढे ईर्ष्या (मत्सर) जन्माला आली. इंद्राच्या त्या तीव्र मत्सरयुक्त मानसिकतेतून एक अत्यंत भयानक, काळ्या वर्णाचा आणि क्रूर स्वभावाचा दैत्य प्रगट झाला.

मत्सराच्या लहरींतून निर्माण झाल्यामुळे त्याचे नाव ‘मत्सरासुर’ ठेवण्यात आले. मत्सरासुराने जन्मतःच शुक्राचार्यांना आपले गुरु मानले. शुक्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने भगवान शंकराची हजारो वर्षे अत्यंत कठोर तपश्चर्या केली.

त्याच्या उग्र तपावर प्रसन्न होऊन भगवान महादेवांनी त्याला वर मागण्यास सांगितले. मत्सरासुराने त्रैलोक्यातील कोणताही देव, दानव, यक्ष, गंधर्व किंवा मानवी शस्त्र मला पराभूत करू शकणार नाही. विश्वातील कोणतीही शक्ती माझा वध करू शकणार नाही, असा वर मागितला. महादेवांनी हा वर प्रदान करताच मत्सरासुराचा उन्माद पराकोटीला पोहोचला.

वरदान मिळताच मत्सरासुराने सर्वप्रथम इंद्रावर आक्रमण करून स्वर्गाचे सिंहासन बळकावले. त्यानंतर त्याने पृथ्वीवरील सर्व ऋषींचे आश्रम, यज्ञ आणि धर्मकर्मे नष्ट केली. विष्णू, यम, वरुण, कुबेर या सर्व लोकपालांना त्याने पदच्युत केले.

मत्सरासुराने स्वतःचे दोन पुत्र – ‘सुप्रिय’ आणि ‘सुदेह’ यांना हाताशी धरून विश्वात फक्त ईर्ष्या, द्वेष आणि अविश्वास पसरवला. देवता आणि मानवांच्या मनात सतत दुसऱ्याच्या सुखाचा हेवा वाटू लागला. ज्ञानाचा लोप झाला आणि सर्वत्र केवळ मत्सर जळू लागला.

मत्सरासुराच्या भयाने सर्व देव, गंधर्व आणि ऋषी–मुनी जंगलात भटकू लागले. शेवटी सर्व देवता एकत्र येऊन महर्षी मुद्गल आणि भगवान दत्तात्रेयांच्या मार्गदर्शनाखाली कैलासावर भगवान शंकरांच्या आश्रयाला गेले. शंकरांनी देवांना सांगितले, मत्सरासुर माझ्याच वराने अजिंक्य झाला आहे. बाह्य शस्त्राने त्याचा पराभव अशक्य आहे. मत्सराचा नाश केवळ मूळ ओंकारस्वरूप, आद्य विवेकाचे अधिष्ठान असलेले ‘वक्रतुंड’च करू शकतात.

सर्व देवांनी एकत्र येऊन भगवान गणेशाच्या ‘एकाक्षर’ (गं) मंत्राचे अखंड अनुष्ठान सुरू केले. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन परब्रह्म श्रीगणेशांनी ‘वक्रतुंड’ रूपात दिव्य अवतार धारण केला:

ते रूप प्रचंड महाकाय दश्भूजांचे तेजस्वी रूप होते, ज्यात पाश, अंकुश, परशू, कमळ, गदा इत्यादी दिव्य आयुधे धारण करून सिंह वाहन होते. या गेन्श अवताराची विशेष खुण म्हणजे वळलेली (वक्र असलेली) सोंड. ही वक्र सोंड साक्षात नादब्रह्म ‘ॐ’काराची आकृती दर्शवत होती.

वक्रतुंडाच्या आगमनाने संपूर्ण विश्वात एक विलक्षण शांततेची आणि सात्त्विकतेची लहर पसरली.

जेव्हा मत्सरासुराला समजले की देवांनी वक्रतुंडाचा आश्रय घेतला आहे, तेव्हा त्याने आपल्या पुत्रांसह महाविशाल सैन्य घेऊन वक्रतुंडावर चढाई केली.

युद्धभूमीवर वक्रतुंडाच्या वाहनाने (सिंहाने) प्रचंड गर्जना करून मत्सरासुराच्या सैन्यात घबराट निर्माण केली. वक्रतुंडांनी एका क्षणात मत्सरासुराचे दोन्ही पुत्र – सुप्रिय आणि सुदेह यांचा संहार केला. आपल्या पुत्रांचा अंत पाहून मत्सरासुर प्रचंड संतापला आणि त्याने विविध मायावी अस्त्रांचा मारा सुरू केला.

परंतु भगवान वक्रतुंडांनी कोणतेही विनाशकारी अस्त्र न चालवता केवळ आपल्या वक्र सोंडेतून एक प्रचंड ’हुंकार’ (प्रणव नाद – ॐ) सोडला. त्या एकाच ओंकाराच्या कंपनाने मत्सरासुराची सर्व मायावी शक्ती, वरदानाचे तेज आणि अहंकाराचे बळ क्षणात शोषून घेतले. मत्सरासुराचे शरीर निष्प्रभ झाले आणि त्याला जमिनीवर पाय टेकणेही अशक्य झाले.

जेव्हा मत्सरासुराने पाहिले की हा कोणताही सामान्य देव नसून साक्षात परात्पर परब्रह्म आहे, तेव्हा त्याच्या डोळ्यांतील मत्सराचा पडदा फाटला.

सर्व सामर्थ्य गळून पडल्यावर मत्सरासुर वक्रतुंडाच्या चरणी लोटांगण घालून अश्रू ढाळू लागला, भगवान वक्रतुंडाच्या प्रणव नादाने मत्सरासुराच्या अंतर्मनातील द्वेष जाळून खाक झाला आणि मत्सरासुर अनन्यभावे भगवान वक्रतुंडाना शरण आला.

भगवान वक्रतुंड अत्यंत दयाळू आहेत. त्यांनी मत्सरासुराला अभय दिले धर्माचरण, सत्वगुण, आणि गणेश स्मरण असलेल्या ठिकाणी मत्सराने राहून नये असे वचन घेतले.

मत्सरासुराने हे वचन मान्य केले आणि तो वक्रतुंडाचा नम्र सेवक बनला. देवांनी वक्रतुंड गणेशाचा जयजयकार केला, स्वर्गाचे राज्य इंद्राला परत मिळाले आणि विश्वात पुन्हा शांती प्रस्थापित झाली.

मुद्गल पुराणातील ही कथा केवळ राक्षसाच्या वधाची नसून आपल्या अंतर्मनाचे विश्लेषण आहे:

’मत्सर’ हा मानवाच्या षड्रिपूंमधील (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) सर्वात विषारी विकार आहे. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून मनात होणारी जळजळ म्हणजेच मत्सर. हा विकार माणसाच्या सर्व चांगल्या गुणांना आणि पुण्याला जाळून टाकतो.

माणसाची बुद्धी जेव्हा ईर्षेने विकृत होते, तेव्हा ती सरळ विचार करू शकत नाही. या विकृत (वक्र) मनाला सन्मार्गावर आणण्यासाठी बुद्धीला ओंकाराचे (वक्रतुंडाचे) वळण द्यावे लागते.

वक्रतुंडांनी मत्सरासुराला बाह्य शस्त्राने मारले नाही, तर ‘नादाने’ (प्रणव नाद) शांत केले. याचा अर्थ असा की, मनातील ईर्ष्या ही भांडणाने किंवा क्रोधाने संपत नाही; ती केवळ ‘आत्मज्ञान, ध्यान आणि नादब्रह्माच्या (ॐकार)’ सात्त्विक कंपनांनीच विरघळवता येते.

जीवनात जेव्हा जेव्हा आपल्या मनात दुसऱ्याबद्दल हेवा, मत्सर किंवा जळफळाट निर्माण होईल, तेव्हा ‘ॐ वक्रतुंडाय हुम्’ या मंत्राचे किंवा वक्रतुंड रूपाचे ध्यान करणे म्हणजेच मत्सरासुराचा पराभव करणे होय.

।। गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया।।



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६



राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संशोधन व विकास कक्षाच्या वतीने महाविद्यालयीन स्तरावरील ‘अविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धा २०२६–२७’ उत्साहात झाली.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात ‘अविष्कार’ संशोधन प्रकल्प स्पर्धा उत्साहात

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संशोधन व विकास कक्षाच्या वतीने महाविद्यालयीन स्तरावरील ‘अविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धा २०२६–२७’ उत्साहात झाली. या स्पर्धेत विविध सहा विभागांमधून एकूण १३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता व नाविन्यपूर्ण विचार विकसित करणे, तसेच दैनंदिन जीवनातील सामाजिक, पर्यावरणीय, आर्थिक व तांत्रिक समस्यांची ओळख करून त्यावर नाविन्यपूर्ण व व्यवहार्य उपाय शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

स्पर्धेत मानव्यविद्या, भाषा व ललित कला; वाणिज्य, व्यवस्थापन व विधी; शुद्ध विज्ञान; कृषी व पशुसंवर्धन; अभियांत्रिकी व तंत्रज्ञान; तसेच वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र या सहा विभागांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांचे मूल्यमापन संशोधन समस्येची उपयुक्तता, नावीन्य, उद्दिष्टांची स्पष्टता, संशोधन पद्धती, सर्जनशीलता, व्यवहार्यता, माहितीचे संकलन व विश्लेषण, सामाजिक उपयुक्तता, सादरीकरण कौशल्य आणि परीक्षकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे उत्तरे देण्याची क्षमता या निकषांवर करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक चौकटीबाहेर विचार करण्याचे, प्रश्न विचारण्याचे, नवनवीन संकल्पना विकसित करण्याचे आणि संशोधनाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी जिज्ञासा, आत्मविश्वास आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधनाकडे पाहावे, असे त्यांनी सांगितले.

मानव्यविद्या, भाषा व ललित कला विभागासाठी डॉ.मुंडे बी.एम. व डॉ.कोतकर एस.एम.,वाणिज्य, व्यवस्थापन व विधी विभागासाठी प्रा.जाधव एम.एम.व प्रा.देठे एन.एस., शुद्ध विज्ञान विभागासाठी डॉ. राऊत जी.ए. व प्रा.तांबे बी.आर., कृषी व पशुसंवर्धन विभागासाठी प्रा.खान एम.आर. व डॉ.बावके एस.एस., अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागासाठी डॉ.केकडे एस.एस. व प्रा.शिंदे ए.एस., वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र विभागासाठी डॉ. काथवटे एल.जी. व डॉ. खिलारी ए.एम. यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विलास एलके यांनी केले. तसेच शैक्षणिक व संशोधन समन्वयक डॉ. मुबारक शेख यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी परिश्रम घेतले.



सिव्हिल हाडकोतील जोशी परिवाराची शाडू मातीची गणेशमूर्ती ही मूर्ती माझी बाग चे संजय जोशी दरवर्षी सातत्याने करत आहेत.

# अहिल्यानगर शहरात १९ सप्टेंबर रोजी एक अजनबी हसीना से गीतांची मैफिल



नगर – जुन्या व नव्या हिंदी चित्रपट गीतांची सुरेल मेजवानी देणाऱ्या ‘गाता रहे मेरा दिल’ प्रस्तुत एक अजनबी हसीना से संगीत गीतांची मैफिलीचे आयोजन १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता रोज गोल्ड हॉल आकाशवाणी केंद्रा समोर शिंगवी ज्वेलर्सच्या बेसमेंट प्रोफेसर चौक येथे करण्यात आले आहे. ‘एक अजनबी हसीना से…’ या संकल्पनेअंतर्गत ‘नगमों नये पुराने’ या कार्यक्रमाचा भाग–१ सादर करण्यात येणार आहे.

या मैफिलीत संजय भिंगारदिवे, ज्योती भिंगारदिवे, राजेंद्र शहाणे, दीपा भालेराव, निलेश गाडेकर, भैरवनाथ आडागळे, सुनील भंडारी, माधवी गुजर, श्री.शिंदे, बाबासाहेब जगताप, मार्टिन गोरडे, राजकुमार सहदेव, अमीन धारणी, मनोज डफळ, श्री. शिरसाठ व श्री. मोरे हे गायक विविध लोकप्रिय गीते सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबिद खान करणार आहेत.

संगीतप्रेमींसाठी आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम विनामूल्य असून कार्यक्रम वेळेवर सुरू होणार आहे. जुन्या–नव्या हिंदी गीतांचा सुरेल आनंद घेण्यासाठी अहिल्यानगर शहर व परिसरातील संगीतप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अमीन धारणी यांनी केले आहे.

# अहिल्यानगरमध्ये २० सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय ‘अबॅकस स्पर्धेचे’ आयोजन

### ज्युनिअर ते लेवल ५ आणि वैदिक मॅथ्सच्या विविध गटांत विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

नगर – युनिव्हर्सल अबॅकस अ‍ॅण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या गणितीय कौशल्याला वाव देण्यासाठी राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन २० सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. एमआयडीसी परिसरातील स्नेहालय येथे सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत ही स्पर्धा होणार आहे. राज्यातील विविध भागांतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन असोसिएशनच्या अध्यक्षा हेमलता काळाणे व सचिव विशाल आढाव यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये गणितीय गणना, एकाग्रता, स्मरणशक्ती, अचूकता आणि वेग या कौशल्यांचा विकास व्हावा, तसेच त्यांच्या बौद्धिक क्षमतेला स्पर्धात्मक व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अबॅकस आणि वैदिक मॅथ्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणित विषयाकडे अधिक आत्मविश्वासाने पाहण्याची संधी या स्पर्धेतून मिळणार आहे.




या राज्यस्तरीय स्पर्धेत ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेव्हल १ ते लेव्हल ५ तसेच वैदिक मॅथ्स अशा विविध गटांमध्ये विद्यार्थ्यांची स्पर्धा होणार आहे. प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार असून, वेळेत अचूक गणिती गणना करण्यावर स्पर्धेचा भर राहणार आहे.

स्पर्धेच्या सकाळच्या सत्रात विविध गटांतील स्पर्धा पार पडतील. त्यानंतर दुपारच्या सत्रात आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका दिपालीताई बारस्कर, संध्याताई पवार, महेश तवले, मुख्याध्यापिका शितल गुंदेचा, अ‍ॅड. सौ. उज्वला मुरकुटे, योगा प्रशिक्षिका शिल्पा बालवे, मुख्याध्यापिका मिनाक्षी दगडे तसेच डोंगरे सर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेतील प्रत्येक गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीसह बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. त्यामुळे केवळ विजेत्यांचाच नव्हे, तर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा गौरव करण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा बौद्धिक व कौशल्याधारित अबॅकस स्पर्धांचे महत्त्व मोठे असून, पालकांनी आपल्या पाल्यांना अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन हेमलता काळाणे व विशाल आढाव यांनी केले आहे.

### वंदू गणेशा...



रेखाचित्रकार दिलीप शहापूरकर,
माणिकचौक, अ.नगर
मो.७९७२९८९७८०

# ‘पीपल्स हेल्पलाईन’ आणि ‘भारतीय जनसंसदेचे’ २३ सप्टेंबरला ‘राष्ट्रीय धारणालय क्रांती आंदोलन’

नगर – मनुस्मृतीजन्य जात–वर्ण व्यवस्था, जन्माधारित श्रेष्ठत्व आणि पुरुषसत्ताक मानसिकतेविरोधात घटनात्मक मूल्यांच्या आधारे जनजागृती करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने ‘राष्ट्रीय धारणालय क्रांती आंदोलन’ घोषित करण्यात येणार आहे. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले जाणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.



पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष अ‍ॅड. कारभारी गवळी आंदोलनाची माहिती देताना म्हणाले की, जातीय भेदभाव आणि पुरुषसत्ताक विचार केवळ कायद्याच्या माध्यमातून संपुष्टात येत नाहीत. सामाजिक रूढी, परंपरा आणि भेदभावपूर्ण मानसिकता बदलण्यासाठी व्यापक वैचारिक आणि सामाजिक प्रबोधनाची आवश्यकता आहे. याच उद्देशाने ‘धारणालय क्रांती’ची संकल्पना मांडण्यात आली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, अहिंसा आणि मानवी प्रतिष्ठा या घटनात्मक मूल्यांचा प्रसार करण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. जन्माच्या आधारावर कोणालाही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानू नये, तसेच जात, लिंग किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर भेदभाव होऊ नये, अशी भूमिका आयोजकांनी मांडली आहे.

आंदोलनाच्या प्रमुख कार्यदिशांमध्ये घटनात्मक मूल्यांचे शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री–पुरुष समानता आणि श्रमप्रतिष्ठेला प्रोत्साहन देणे, आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना संरक्षण मिळण्यासाठी जनजागृती करणे तसेच महिलांचे शैक्षणिक, आर्थिक आणि मालमत्ताविषयक अधिकार बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे यांचा समावेश आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्यावरही आंदोलनात भर दिला जाणार आहे. संविधानातील मूल्ये केवळ राज्यव्यवस्थेपुरती मर्यादित न राहता सामाजिक व्यवहारातही रुजली पाहिजेत, अशी भूमिका आयोजकांनी व्यक्त केली आहे.

अ‍ॅड. गवळी यांनी पुढे सांगितले की, हे आंदोलन कोणत्याही धर्म, जात किंवा व्यक्तीविरोधात नसून विषमता, भेदभाव आणि शोषणाला प्रोत्साहन देणाऱ्या विचारांविरोधात घटनात्मक व विवेकाधिष्ठित जनजागृतीचे आंदोलन असेल. नागरिकांनी सामाजिक विषमता ओळखून तिची चिकित्सा करावी आणि मानवी प्रतिष्ठेला पूरक मूल्यांचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनात महिला, युवक, विद्यार्थी, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अ‍ॅड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात प्रयत्नशील आहेत.

# स्त्रीचे आरोग्य जपल्यास सशक्त कुटुंब व समाजाची निर्मिती

### आनंद भंडारी यांचे प्रतिपादन; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग व गर्भवती महिला तपासणी शिबिर; ११० महिलांची तपासणी, विविध उपचार व शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये वर्षभर विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून रुग्णसेवेचा वसा जपला जात आहे. स्त्री निरोगी राहिल्यास कुटुंब आणि समाज निरोगी राहतो, ही जाणीव आता समाजाला झाली आहे. सशक्त समाज आणि सशक्त कुटुंबासाठी स्त्रीचे आरोग्य महत्त्वाचे आहे. केंद्र व राज्य सरकारदेखील यासाठी योगदान देत आहे. सशक्त पिढी निर्माण करण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलची आरोग्य चळवळ हातभार लावत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने मराठवाडा मित्र मंडळ व मान कन्हैय्या ट्रस्ट आयोजित स्त्रीरोग व गर्भवती महिला मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन करताना आनंद भंडारी.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने १८ सप्टेंबर रोजी मराठवाडा मित्र मंडळ व मान कन्हैय्या ट्रस्ट आयोजित स्त्रीरोग व गर्भवती महिला मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आनंद भंडारी बोलत होते. यावेळी मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, मान कन्हैय्या ट्रस्टच्या डॉ. सुधा कांकरिया, सौ. डॉ. स्मिता आनंद भंडारी, मराठवाडा मित्र मंडळाचे सचिव नंदकुमार देशपांडे, कार्याध्यक्ष सदाशिवराव मोहिते, मनोहर कटके, पुरुषोत्तम दरबस्तवार, संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, निखिल लोढा, सतीश लोढा, अभय गुगळे, मानकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, सुनील मालू, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ. तृप्ती पाटील, डॉ. प्रथमेश झेंडे आदींसह मराठवाडा मित्र मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

आनंद भंडारी पुढे म्हणाले की, माता व बालमृत्यू कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कार्य केले जात आहे. कुपोषणावर मात करण्यासाठीदेखील विशेष प्रकल्प सुरू आहे. मराठवाडा मुक्ती दिनाची पार्श्वभूमी लक्षात घेता या ऐतिहासिक घटनेला ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. १७ सप्टेंबर १९४८ या दिवसाची आठवण म्हणून मराठवाडा मित्र मंडळाने घेतलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. ते म्हणाले की, मराठवाडा मित्र मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यावर्षी बालएकांकिका स्पर्धादेखील घेण्यात आली. ‘बेटी बचाव, बेटी पढाव’ हा विशेष उपक्रम सुरू आहे. आनंद भंडारी हे नगरचे जावई असून त्यांच्या पत्नी डॉक्टर या अहिल्यानगरच्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

संतोष बोथरा म्हणाले की, जिल्हा परिषदेत आनंद भंडारी यांच्या माध्यमातून कार्यक्षम अधिकारी मिळाला आहे. सर्व यंत्रणा उत्तम चालते. जिल्हा परिषदेत सर्वसामान्य नागरिक गेला तरी त्याचे काम होते, हेच त्यांच्या कामाची पावती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. तृप्ती पाटील म्हणाल्या की, महिलांच्या समस्या अनेक असतात; मात्र त्या अनेकदा त्या अंगावर काढतात. त्यामुळे भविष्यात अनेक आजारांचा धोका संभवतो. वेळीच निदान करणे महत्त्वाचे आहे. मासिक पाळीचे प्रश्न, गर्भपिशवीचे प्रश्न यांसह सर्व सुविधा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. तसेच महिला गर्भवती राहिल्यानंतर त्यांची डिलिव्हरी आणि सुदृढ बालकाचे आरोग्य याकडेदेखील विशेष लक्ष दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व उपचार, विविध शस्त्रक्रिया व तपासण्या अल्पदरात उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. डॉ. सुधा कांकरिया यांनी स्त्री जन्माचे स्वागत करण्याची प्रतिज्ञा सर्व उपस्थित पाहुणे तसेच हॉस्पिटलमधील सर्व रुग्ण व नातेवाईकांना दिली. या शिबिरात एकूण ११० महिला रुग्णांची तपासणी करण्यात आली. दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, सिजेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, दुर्बिणीद्वारे गर्भाशयाची पिशवी काढणे, हिस्टरीजिओग्राफी, गर्भाशयाच्या मुखाच्या पेशींची तपासणी तसेच गर्भवती स्त्रियांच्या सर्व चाचण्या सवलतीच्या दरात करण्यात आल्या.

गर्भवती महिलांसाठी आहाराचा सल्ला तसेच घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. एमआरआय व सीटी स्कॅनची सुविधादेखील सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली. या माध्यमातून महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याबरोबरच वेळेत निदान व उपचार मिळण्यासाठी शिबिराचा लाभ महिलांना मिळाला.

# सेवा संकल्प अभियानातून ‘विकसित भारताचा’ संदेश; जिल्हा परिषदेत साकारली भारताच्या नकाशाची रांगोळी

### महिला कर्मचाऱ्यांच्या कलाविष्कारातून शासकीय योजनांचा जागर; ड्रोनद्वारे करण्यात आले विहंगम छायाचित्रण

नगर – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात राबविण्यात येत असलेल्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा परिषदेत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील गावपातळीपर्यंत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती करण्यात येत आहे.





या अभियानांतर्गत गुरुवारी जिल्हा परिषद मुख्यालयाच्या आवारात महिला कर्मचाऱ्यांनी भारताच्या नकाशाची भव्य व आकर्षक रांगोळी साकारत देशभक्तीचा आणि ‘सेवा संकल्पा’चा संदेश दिला. विविध रंगांनी साकारलेल्या या रांगोळीतून केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.

**ड्रोनद्वारे विहंगम छायाचित्रण**

जिल्हा परिषद आवारात साकारण्यात आलेल्या या भव्य रांगोळीचे ड्रोनद्वारे विहंगम छायाचित्रण करण्यात आले. आकाशातून टिपलेल्या या रांगोळीच्या छायाचित्रातून भारताच्या नकाशाचे भव्य स्वरूप आणि त्यामध्ये साकारलेला योजनांचा संदेश प्रभावीपणे अधोरेखित झाला.

गावपातळीपर्यंत विविध उपक्रमांना गती : ‘सेवा संकल्प अभियान’ केवळ जिल्हा परिषद मुख्यालयापुरते मर्यादित न ठेवता गावपातळीपर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोहोचविण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजनांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणे, योजनांची जनजागृती करणे, नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करणे तसेच योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीला गती देण्यावर भर देण्यात येत आहे.

अभियानाच्या माध्यमातून विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या यशोगाथा तयार करून त्या व्यापक स्वरूपात जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कामही सुरू आहे. त्यामुळे शासनाच्या योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल अधोरेखित होण्यास मदत होत आहे.

**अधिकारी–कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

या अभियानात जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील अधिकारी आणि कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून, ‘सेवा, संकल्प आणि जनकल्याण’ या भावनेतून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. महिला कर्मचाऱ्यांनी साकारलेली भारताच्या नकाशाची भव्य रांगोळी हा याच सहभागाचा कलात्मक आविष्कार ठरला.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शासनाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

# ‘जॉईज’च्या अध्यक्षपदी सुजित गुगळे, सेक्रेटरीपदी शुभम गांधी यांची निवड

नगर – जैन ओसवाल पंचायत सभा अंतर्गत जैन ओसवाल युवक संघाच्या (जॉईज) अध्यक्षपदी सुजित सुनील गुगळे आणि सेक्रेटरीपदी शुभम संजय गांधी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष सीए अशोक पितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी झाल्या.



जैन समाजाची शिखर संस्था असलेल्या जैन ओसवाल पंचायत सभेच्या अंतर्गत युवा वर्गाचे संघटन जॉईजच्या माध्यमातून झालेले आहे. जॉईजतर्फे वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम, स्पर्धा घेऊन मुलामुलींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. याशिवाय मागील १६ वर्षांपासून ऑगस्ट महिन्यात स्नेह उत्सव आयोजित करण्यात येतो. यात मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा घेण्यात येतात. स्नेह उत्सवात दरवर्षी हजारो मुले मुली सहभागी होतात. यात देशभक्तीपर कार्यक्रम, रक्तदान शिबिरही घेण्यात येते. याशिवाय दरवर्षी एप्रिलमध्ये क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यात खुल्या गटासह महिला व विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गट असतात. जॉईजचे मावळते अध्यक्ष भूषण भंडारी यांच्या नेतृत्वाखाली मागील वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले. समाजातील कर्तृत्ववानांचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

नूतन अध्यक्ष सुजित गुगळे व सेक्रेटरी शुभम गांधी यांनी जॉईजची परंपरा कायम ठेवत आगामी काळात समाजातील युवक युवतींसाठी विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगितले.



आर्ट ऑफ लिविंगच्या जागतिक स्तरावरील शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये मूलांशु परदेशीची निवड झाल्याबद्दल छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# ‘आर्ट ऑफ लिविंग’च्या जागतिक स्तरावरील शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये मूलांशु परदेशीची निवड

नगर – द वर्ल्ड फोरम ऑफ आर्ट अँड कल्चर ही आर्ट ऑफ लिविंग या जागतिक संस्थेची सांस्कृतिक शाखा आहे, या शाखेने आयोजित केलेल्या जागतिक पातळीच्या स्पर्धेमध्ये तब्बल १०००० स्पर्धकांनी संपूर्ण जगातून सहभाग घेतला होता. या स्पर्धकांमधून शास्त्रीय गायनासाठी उपांत्य फेरीमध्ये १३ स्पर्धक निवडले गेले, ज्यामध्ये आपल्या अहिल्यानगर शहरातील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल या शाळेचा दहावी मधील विद्यार्थी मूलांशु परदेशी याची निवड झाली आहे.

या कामगिरीबद्दल संस्थेच्या वतीने प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते, सौ. सुनीता मुथ्था, संस्थेचे विश्वस्त गौरव मिरीकर व शाळेचे मुख्याध्यापक कैलास साबळे यांच्या उपस्थितीत मूलांशुचा आशीर्वाद देऊन विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी शाळेचे संगीतशिक्षक परशुराम मुळे व गायक पवन श्रीकांत नाईक ज्यांच्या मार्गदर्शनाखाली तो गेल्या ११ वर्षापासून संगीताचे धडे गिरवत आहे तसेच श्रेयस रवींद्र शित्रे हे उपस्थित होते. या स्पर्धेतील गायनासाठी त्याला संवादिनीवर जितेंद्र शित्रे व तबल्यावर हर्षद भावे यांची साथ लाभली.

या वाटचालीत त्याला वेळोवेळी, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे आशीर्वाद, मार्गदर्शन व पाठबळ लाभले आहे.

@WorldForumforArtandCulture च्या You-Tube चॅनलवर मूलांशु परदेशी च्या गीताला लाइक व कमेंट करून विशेष सहकार्य करावे असे आवाहन त्याचे आई–वडील सौ. राधिका सुशील परदेशी व सुशील सुभाष परदेशी यांनी केले आहे.

# हिंदी पंधरवड्यानिमित्त गुलदस्ताचे कवी संमेलन उत्साहात

नगर – हिंदी पंधरवड्यानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटी (डिस्ट्रिक्ट ३१३२), आधार आपुलकी फाउंडेशन, अमर कविता सोशल फाउंडेशन आणि कवींच्या हक्काचे व्यासपीठ असलेल्या ‘गुलदस्ता’ साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हिंदी शिकविणाऱ्या प्राध्यापकांचा हिंदी दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. शहरातील स्थानिक कवी, शायर तसेच साहित्याची आवड असणाऱ्या कलाकारांना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने ‘गुलदस्ता’ कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध कवींनी सहभाग नोंदवत आपल्या दर्जेदार कविता, शायरी व साहित्यिक रचना सादर केल्या. काव्य, शायरी आणि सामाजिक विषयांवरील संवेदनशील मांडणीमुळे कार्यक्रमाला रंगत आली. उपस्थित साहित्यप्रेमींनी काव्यमय वातावरणाचा मनमुराद आनंद घेतला.



हिंदी पंधरवड्यानिमित्त आयोजित ‘गुलदस्ता’ कवी संमेलनात सहभागी कवी. (छाया – समीर मन्यार)

प्रमुख पाहुणे युनूस तांबटकर म्हणाले, तरुणाईला नकारात्मकतेतून बाहेर काढून देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक विचार करण्यास आणि योगदान देण्यास प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. भारत हा तरुणांचा देश असून या युवा शक्तीचा योग्य दिशेने उपयोग झाला तर देशाच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते. कवी आणि शायर हे समाजातील परिस्थितीचे वास्तव आपल्या लेखणीतून मांडत असतात. त्यामुळे साहित्य आणि कलेला समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या शायरी आणि भाषणांचा दाखला देत त्यांनी उत्तम वक्तृत्व, संयम आणि सकारात्मक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. सईद शेख म्हणाले की, अहिल्यानगरसारख्या शहरात अनेक नवोदित कवी, लेखक आणि कलाकार आहेत मात्र आपल्या कलेचे सादरीकरण करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनेकांची कला त्यांच्या मनातच दडून राहते. ‘गुलदस्ता’च्या माध्यमातून अशा कलाकारांना आपल्या भावना, विचार आणि कलागुण व्यक्त करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या अंगी कोणती ना कोणती कला दडलेली असते. त्या कलेला प्रोत्साहन, योग्य दिशा आणि सादरीकरणाची संधी मिळाली तर त्यातून उत्तम साहित्यिक व कलाकार घडू शकतात. केवळ मोठ्या शहरांमध्येच नव्हे तर स्थानिक पातळीवरील कवी आणि नवोदित कलाकारांनाही प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. साहित्यिक कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचारांची देवाणघेवाण होते, विविध विषयांवर संवाद निर्माण होतो आणि नव्या पिढीला साहित्याशी जोडण्याची संधी मिळते. त्यामुळे अशा सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रमांना रोटरी क्लबच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य केले जाईल, असे डॉ. शेख यांनी सांगितले.

समाजोपयोगी तसेच सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी रोटरी क्लब सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्रास्ताविकात रवी डीक्रूज सांगितले.

या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. सईद शेख, सचिव उदयभानसिंग परदेशी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. ‘गुलदस्ता साहित्य मंच’च्या आयोजनासाठी संयोजक निखिल कुलकर्णी, हेमंत लोहगावकर, रवी डिक्रुज यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे सदस्य, पदाधिकारी, शहरातील साहित्यप्रेमी, कवी, कलाकार आणि नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन ओमेगा नंदा यांनी केले. निखिल कुलकर्णी व सचिव उदयभानसिंग परदेशी यांनी आभार मानले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## ‘बुश लिजेंड’ चा भुलभुलैय्या

टिकटॉक, फेसबुक आणि इंस्टाग्रामवर सध्या ‘बुश लिजेंड’ नावाच्या एका व्यक्तिमत्त्वाची प्रचंड चर्चा आहे. कधी अंगाला गेरू फासलेला, तर कधी खाकी कपड्यांमधील हा आदिवासी तरुण प्रेक्षकांना ऑस्ट्रेलियातील विविध प्राण्यांची माहिती देतो. पार्श्वभूमीला वाजत असलेले दिजेरिडूचे संगीत आणि त्या तरुणाचा उत्साह पाहून हजारो लोक त्याचे चाहते बनले आहेत.



मात्र, धक्कादायक वास्तव हे आहे की, हा माणूस अस्तित्वातच नाही; तो आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) द्वारे तयार करण्यात आलेला एक ‘डिजिटल अवतार’ आहे.

हे छोटे व्हिडीओ अतिशय आकर्षक पद्धतीने बनवले जातात. यामध्ये दिसणारा तरुण प्राण्यांशी संवाद साधताना आणि माहिती देताना दिसतो. अनेक युजर्सनी कमेंटस्‌मध्ये म्हटले आहे की, त्याला स्वतःचा टीव्ही शो असायला हवा. मात्र, हे सर्व व्हिडीओ पूर्णपणे कृत्रिम आहेत. या चॅनेलच्या डिस्क्रिप्शनमध्ये जरी हा भाग ‘एआय’ असल्याचे नमूद केले असले, तरी सामान्य युजर्स अनेकदा प्रोफाईल चेक न करताच याला खरे मानतात.

तज्ज्ञांच्या मते, हा प्रकार मूळिनवासी लोकांच्या संस्कृतीची आणि ज्ञानाची एक प्रकारची ‘सांस्कृतिक चोरी’ आहे. कोणत्याही समुदायाची परवानगी न घेता किंवा त्यांच्याशी संबंध न ठेवता तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांची प्रतिमा वापरली जात आहे. यामुळे मूळिनवासी समुदायांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. काही व्हिडीओंवर एआय वॉटरमार्क आहेत, तर काहींच्या कॅप्शनमध्ये तसा उल्लेख आहे. तरीही, अनेक प्रेक्षक यापासून अनभिज्ञ आहेत.

फेसबुकवर एका युजरने लिहिले, ‘तुमची ऊर्जा अगदी स्टीव्ह इरविनसारखी आहे आणि तुमचा आवाज ऐकायला खूप छान वाटतो.’ परंतु, प्रत्यक्षात तो आवाज आणि ती ऊर्जा दोन्ही बनावट आहेत. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, या व्हिडीओंखाली येणाऱ्या कमेंटस्. या एआय व्यक्तिमत्त्वाचे कौतुक करताना अनेक लोक खऱ्या मूळिनवासी समुदायाबद्दल अपमानास्पद आणि वांशिक टिपणी करत आहेत. यामुळे खऱ्या आदिवासी समुदायांच्या भावना दुखावत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ‘बुश लिजेंड’चा निर्माता न्यूझीलंड मधील आहे. याचा अर्थ, ज्या ऑस्ट्रेलियन आदिवासी संस्कृतीची प्रतिमा वापरली जात आहे, त्या समुदायाशी निर्मात्याचा कोणताही थेट संबंध नाही.

◆◆◆

## इंजेक्शनवेदनांना पूर्णविराम

वैद्यकीय क्षेत्रात चीनने पुन्हा एकदा आपल्या प्रगत तंत्रज्ञानाचा डंका वाजवला आहे. चिनी शास्त्रज्ञांनी अशा एका उपकरणाची निर्मिती केली आहे, जे मानवी त्वचेच्या खाली लपलेल्या नसा (व्हेन्स) अगदी स्पष्टपणे पाहण्यास मदत करते. यामुळे आता डॉक्टर आणि नर्स यांचे काम सोपे होणार असून, रुग्णांना इंजेक्शन किंवा सलाईन लावताना होणारा त्रास कमी होणार आहे.



चीनच्या एका आघाडीच्या मेडिकल कंपनीने हे रिअल टाईम व्हॅस्क्युलर इमेजिंग डिव्हाईस विकसित केले आहे. हे उपकरण इन्फ्रारेड किरणांचा वापर करून हातावर किंवा शरीराच्या कोणत्याही भागावर प्रकाश टाकते. त्वचेखालील नसा या किरणांना शोषून घेतात आणि काही सेकंदांतच नसांचा एक रंगीत नकाशा त्वचेवर डिजिटल पद्धतीने दिसू लागतो. यामुळे नसांची जाडी आणि त्यांचे अचूक स्थान स्पष्टपणे समजते. या तंत्रज्ञानाचे मोठे फायदे होणार आहे.

अनेकदा लहान मुले, वृद्ध किंवा गंभीर रुग्णांच्या नसा सहज सापडत नाहीत. अशावेळी वारंवार सुया टोचल्या जातात. या मशिनमुळे पहिल्याच प्रयत्नात अचूक ठिकाणी इंजेक्शन टोचणे शक्य होईल. त्यामुळे वेदनांपासून मुक्ती मिळणार आहे. चुकीच्या ठिकाणी सुई लागल्याने रक्ताची गाठ होणे किंवा सूज येणे यांसारखे धोके आता टळणार आहेत. आणीबाणीच्या परिस्थितीत (इमर्जन्सी कंडिशन) रुग्णाला तातडीने सलाईन लावणे आवश्यक असते, तिथे हे उपकरण लाईफ सेव्हर ठरू शकते.

**चीन फ्युचरमध्ये जगतोय?**

जगभरातील आरोग्यतज्ज्ञ चीनच्या या शोधाकडे पाहून थक्क झाले आहेत. सोशल मीडियावर अनेकजण म्हणत आहेत की, ‘चीन २०२६ मध्ये नाही, तर २०३६ च्या विचाराने जगत आहे.’ हे तंत्रज्ञान केवळ एका मशिनचा शोध नसून, रुग्णांच्या उपचाराची पद्धत बदलणारा एक क्रांतिकारी टप्पा आहे. या तंत्रज्ञानामुळे डॉक्टर आणि नर्सना अंदाजावर अवलंबून राहावे लागणार नाही. इंजेक्शन आणि सलाईन लावणे अधिक सुरक्षित होईल. लवकरच हे तंत्रज्ञान जगभरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध होणार आहे.

◆◆◆



## सापडली सर्वात जुनी गुहाचित्रे

मानवी संस्कृती, कला आणि कल्पकता यांचा उगम युरोपमध्ये झाला, हा अनेक दशकांपासूनचा जागतिक समज आता मोडीत निघाला आहे. इंडोनेशियातील सुलावेसी बेटावर शास्त्रज्ञांना मानवी हातांचे असे काही ठसे सापडले आहेत, जे तब्बल ६७,८०० वर्षे जुने आहेत. हे ठसे म्हणजेच रॉक आर्ट (गुहाचित्र) आतापर्यंतची जगातील सर्वात जुनी असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे.

इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलियातील संशोधकांच्या एका पथकाने सुलावेसी बेटावरील मुना परिसरात एका अज्ञात गुहेचा शोध लावला. या गुहेच्या भिंतीवर त्यांना हातांचे ठसे आढळले. हे ठसे बनवण्यासाठी आदिमानवाने भिंतीवर हात ठेवून त्यावर नैसर्गिक रंग फुंकले होते, ज्यामुळे हाताची बाह्यरेखा तयार झाली. काही हातांच्या बोटांची टोके टोकदार करण्यासाठी त्यात बदल करण्यात आले होते. ही शैली केवळ सुलावेसीमध्येच पाहायला मिळते.


या गुहाचित्रांचे वय मोजण्यासाठी शास्त्रज्ञांनी अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. गुहेच्या भिंतीवर या चित्रांच्या वर कॅल्शियम कार्बोनेटचे थर साचले होते. लेसर अबलेशन युरेनियम–सीरिज या तंत्राद्वारे या थरांचे विश्लेषण करण्यात आले, ज्यातून हे स्पष्ट झाले की, ही गुहाचित्रे किमान ६७,८०० वर्षे जुनी आहेत. या शोधापूर्वी जगातील सर्वात जुनी कलाकृती स्पेनमधील गुहेत असल्याचे मानले जात होते (वय सुमारे ६६,७०० वर्षे). मात्र, इंडोनेशियातील हा शोध त्यापेक्षाही १,१०० वर्षांनी जुना आहे. यामुळे कलेचा उगम आशियात झाल्याचे आता सिद्ध होत आहे.

**कोणी बनवली ही गुहाचित्रे?**

इंडोनेशियातील गुहेत सापडलेले हे ठसे नेमके कोणाचे आहेत, यावर अद्याप संशोधन सुरू आहे. शास्त्रज्ञांचे दोन अंदाज आहेत. त्यातील पहिल्या अंदाजानुसार त्याकाळी डेनिसोव्हन्स नामक मानवाचा एक प्राचीन गट होता जो या भागात वास्तव्यास होता, त्यांचे ठसे असावेत. दुसऱ्या अंदाजानुसार आफ्रिकेतून बाहेर पडलेले होमो सेपियन्स या आधुनिक मानवाचे हे ठसे असण्याचीही शक्यता आहे. होमो सेपियन्स हे त्याकाळी आफ्रिकेतून ऑस्ट्रेलियाच्या दिशेने स्थलांतर करत होते. ग्रिफिथ युनिव्हर्सिटीचे संशोधक मॅक्सिम ऑबर्ट यांच्या मते, हा शोध केवळ चित्रांचा नसून मानवी सर्जनशीलतेच्या प्रवासाचा पुरावा आहे. मानवाने केवळ जगण्यासाठी शिकार केली नाही, तर हजारो वर्षांपूर्वी स्वतःला व्यक्त करण्यासाठी कलेचा आधार घेतला होता, हे यातून स्पष्ट होते.

◆◆◆

## बालवाडी आणि मुलांचे गटबॅक्टेरिया



लहान मुलांना बालवाडीत (नर्सरी) पाठवल्याने केवळ त्यांचे सामाजिक ज्ञानच वाढत नाही, तर त्यांच्या शरीरातील सूक्ष्मजीवसृष्टी (मायक्रोबायोम) देखील पूर्णपणे बदलून जाते, असा खळबळजनक खुलासा एका ताज्या संशोधनातून झाला आहे. इटलीतील संशोधकांनी एक वर्षभर ४३ बालकांच्या पोटातील सूक्ष्म जंतूंचा (गटबॅक्टेरिया) अभ्यास केला. त्यांना असे आढळले की, मुले जेव्हा बालवाडीत एकत्र खेळतात, तेव्हा त्यांच्यातील बॅक्टेरियांची देवाणघेवाण वेगाने होते.

अवघ्या ४ महिन्यांच्या उपस्थितीनंतर एकाच बालवाडीतील मुलांमध्ये १५ ते २० टक्के सूक्ष्म जंतू समान असल्याचे दिसून आले. या मुलांनी आपल्या कुटुंबाकडून जितके सूक्ष्म जंतू मिळवले होते, त्यापेक्षा जास्त जंतू त्यांनी बालवाडीतील मित्र–मैत्रिणींकडून मिळवले. मुलांच्या पोटातील मायक्रोबायोम वैविध्यपूर्ण होण्यासाठी त्यांचा एकमेकांशी असलेला संपर्क अत्यंत महत्त्वाचा ठरतो. यामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. त्यामुळे विविध आजारांपासूनही संरक्षण मिळते. वैविध्यपूर्ण सूक्ष्म जंतू पोटातील आरोग्य सुधारतात आणि भविष्यात होणाऱ्या अनेक संसर्गांपासून मुलांचे रक्षण करू शकतात, असे संशोधक सांगतात. हे संशोधन करत असताना संशोधकांना ॲकरमॅन्सिया म्युसिनिफिला नावाचा एक बॅक्टेरिया आईकडून मुलाकडे गेला, त्या मुलाकडून बालवाडीतील दुसऱ्या मुलाकडे आणि तिथून त्याच्या पालकांपर्यंत पोहोचल्याचे दिसून आले. अनेकांना वाटते की, मुले बाहेर गेल्यावर जंतूमुळे आजारी पडतील; पण हे संशोधन सांगते की, ही जंतूंची देवाणघेवाण मुलांच्या शरीरातील सूक्ष्मजीवसृष्टी समृद्ध करण्यासाठी गरजेची आहे. ज्या मुलांचे मोठे भाऊ किंवा बहीण घरी आहेत, त्यांच्यात आधीच चांगली प्रतिकारशक्ती असते; मात्र एकुलत्या मुलांसाठी बालवाडी ही एक आरोग्यवर्धक शाळा ठरत आहे. संशोधक निकोला सेगाटा यांच्या मते, लहान मुलांची रोगप्रतिकारक शक्ती या वयात नवीन जंतू स्वीकारण्यासाठी तयार असते. बालवाडीतील सामाजिक संपर्क हा केवळ खेळासाठी नसून तो एक निरोगी शरीर घडवण्याचा काळ आहे.

◆◆◆

## पृथ्वीवर पाणी कुठून आले?

पृथ्वीवरील महासागर आणि जीवसृष्टीसाठी आवश्यक असलेले पाणी नेमके कुठून आले, हे विज्ञानासाठी आजही एक मोठे कोडे आहे. आतापर्यंत शास्त्रज्ञांचा असा विश्वास होता की, चार अब्ज वर्षांपूर्वी लेट हेवी बॉम्बार्डमेंट काळात कोसळलेल्या धूमकेतू आणि उल्कापातांमुळे पृथ्वीवर पाणी आले. मात्र, युनिव्हर्सिटी स्पेस रिसर्च असोसिएशनच्या (यूएसआरए) नव्या संशोधनाने या सिद्धांताला मोठे आव्हान दिले आहे.



अपोलो मोहिमेतील खडकांचा अभ्यास शास्त्रज्ञांनी अपोलो मोहिमेदरम्यान चंद्रावरून आणलेल्या खडकांचा आणि मातीचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास केला. पृथ्वीवर भूगर्भीय हालचालींमुळे जुने पुरावे नष्ट होतात; मात्र चंद्रावर वातावरण नसल्यामुळे तिथे अब्जावधी वर्षांचा इतिहास गोठलेल्या स्थितीत सुरक्षित आहे. शास्त्रज्ञांनी या खडकांमधील ऑक्सिजन आयसोटोप्सचे विश्लेषण केले.

**संशोधनातील महत्वाचे निष्कर्ष**

चंद्राच्या पृष्ठभागावर अब्जावधी वर्षांपासून जतन झालेल्या नोंदी दर्शवतात की, या उल्कांनी पृथ्वी–चंद्र प्रणालीला फक्त अल्प प्रमाणातच पाणी पुरवले. संशोधनानुसार, चंद्रावरील मातीमध्ये सुमारे १ टक्के पदार्थ उल्कांमुळे आलेला असू शकतो. हे प्रामुख्याने कार्बनयुक्त उल्कांमधून आलेले असून, त्यातील पाण्याचे प्रमाण पृथ्वीवरील महासागरांचे स्पष्टीकरण देण्यासाठी अपुरे आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ७१ टक्के भाग महासागरांनी व्यापलेला असला, तरी पाण्याचे एकूण वजन पृथ्वीच्या वस्तुमानाच्या केवळ ०.०२३ टक्के आहे, तरीही हे प्रमाण खूप मोठे असून, ते फक्त उल्कांमुळे आले असे मानणे आता कठीण झाले आहे. या संशोधनाचा अर्थ असा होतो की, पृथ्वीच्या उत्पत्तीच्या वेळीच किंवा तिच्या अंतर्गत हालचालींतून पाण्याचा मुख्य साठा निर्माण झाला असावा, तो बाहेरील उल्कापातांवर अवलंबून नव्हता.

**चंद्रासाठी महत्त्व**

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील कायमस्वरूपी सावली असलेल्या प्रदेशात असलेले पाणी भविष्यातील मानवी वस्तीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल. नासा आणि इतर अंतराळ संस्था आता चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर साऊथ पोल–ऐटकेन बेसिनमध्ये मानवी तळ उभारण्याचे नियोजन करत आहेत. तिथे असलेले पाण्याचे बर्फ पिण्यासाठी, शेतीसाठी आणि रॉकेट इंधन तयार करण्यासाठी वापरले जाईल. डॉ. टोनी गार्गानो यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या संशोधनामुळे पृथ्वीच्या निर्मितीचा इतिहास आणि ती राहण्यायोग्य कशी झाली, याबद्दलचे नवीन पैलू उलगडले आहेत.

◆◆◆

## अंतर्मनाचा आवाज ऐकला अन् नशीब फळफळलं!

कधीकधी आपल्या मनात येणारी एखादी छोटीशी शंका किंवा हुक्की आपले आयुष्य बदलून टाकू शकते. अमेरिकेतील अर्कांसास राज्यातील एका व्यक्तीच्या बाबतीत असंच काहीसं घडलं आहे. केवळ अंतर्मनाचा आवाज ऐकून विकत घेतलेल्या एका लॉटरी तिकिटाने या व्यक्तीला रातोरात करोडपती बनवले आहे. टोंटीटाऊन येथे राहणारे थॉमस मॅकॉली हे आपल्या दुपारच्या जेवणावरून कामावर परतत होते. वाटेत त्यांना अचानक एक लॉटरी तिकीट विकत घेण्याची तीव्र इच्छा झाली. त्यांनी टोंटीटाऊन झेड–मार्टमध्ये गाडी थांबवली आणि फायरी ५ नावाचे ५ डॉलरचे स्क्रॅच–ऑफ तिकीट खरेदी केले.

**‘जणू तिकीट माझ्याशी बोलत होतं!’ :** थॉमस यांनी लॉटरी अधिकाऱ्यांना सांगितले की, ‘मला फक्त एक अनामिक ओढ वाटली. जणू काही ते तिकीट माझ्याशी बोलत होतं आणि मला ते घ्यायला सांगत होतं.’ थॉमस यांनी जेव्हा तिकीट स्क्रॅच करायला सुरुवात केली, तेव्हा पहिल्याच रांगेत त्यांना एक लाख डॉलर्सचे (सुमारे ९२ लाख रुपये) पहिले बक्षीस दिसले.‘हे खरं असूच शकत नाही, असा विचार माझ्या मनात आला. हे बक्षीस जिंकल्यानंतर पुन्हा कामावर लक्ष केंद्रित करणं माझ्यासाठी खूप कठीण झालं होतं,’ असं थॉमस यांनी हसत हसत सांगितलं.

**विजेत्या रकमेचे काय करणार? :**

अनेकांना लॉटरी लागली की, ते स्वतःसाठी चैनीच्या वस्तू खरेदी करतात. मात्र, थॉमस यांनी जिंकलेल्या पैशांचा वापर एका उदात्त कामासाठी करण्याचे ठरवले आहे. थॉमस यांनी सांगितले की, ते या पैशांमधून आपल्या सासूबाईसाठी व्हिलचेअर एक्सेसिबल म्हणजेच दिव्यांग व्यक्तींना सहज प्रवास करता येईल अशी खास गाडी खरेदी करणार आहेत. उर्वरित रक्कम ते कुटुंबाच्या भविष्यासाठी खर्च करतील.थॉमस यांनी जेव्हा ही बातमी आपल्या पत्नीला आणि कुटुंबाला सांगितली, तेव्हा सुरुवातीला कोणाचाही यावर विश्वास बसला नाही; पण जेव्हा त्यांनी ते विजयी तिकीट दाखवलं, तेव्हा सर्वांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

◆◆◆

## प्राचीन मानव आजच्यापेक्षाही होता सुपरफिट!

आजच्या आधुनिक काळात आपण आरोग्यासाठी जिम, डाएट आणि विविध औषधांचा आधार घेतो. मात्र, तब्बल १२,००० वर्षांपूर्वीचा माणूस आजच्या मानवापेक्षा कितीतरी पटीने अधिक सुदृढ आणि सुपरफिट होता, अशी माहिती एका नव्या संशोधनातून पुढे आली आहे.



दक्षिण अमेरिकेतील चिली देशात सापडलेल्या एका प्राचीन सांगाड्याने जगभरातील वैज्ञानिकांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. हा शोध कोणत्याही नियोजित उत्खननातून लागलेला नाही. चिलीच्या कोकिम्बो प्रांतात ड्रेनेजसाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असताना कामगारांना काही हाडे सापडली. पुरातत्त्वशास्त्रज्ञ सीजर मेंडेझ यांनी जेव्हा याची तपासणी केली, तेव्हा त्यांना हा सुमारे १२,००० वर्षांपूर्वीचा मानवी सांगाडा असल्याचे समजले. त्याला मॅन ऑफ लॉस विलोस असे नाव देण्यात आले आहे.

या सांगाड्याच्या तपासणीत शास्त्रज्ञांना काही थक्क करणाऱ्या गोष्टी आढळल्या. आजच्या काळात ४० व्या वर्षी दात पडणे किंवा खराब होणे सामान्य आहे. मात्र, १२,००० वर्षांपूर्वीच्या या व्यक्तीचे दात अत्यंत मजबूत स्थितीत होते. त्याच्या आहारात साखरेचा अभाव आणि नैसर्गिक अन्नामुळे त्याचे दात आजही शाबूत आहेत. तपासणीत असे दिसून आले की, या व्यक्तीची एक बरगडी कोणत्या तरी अपघातात तुटली होती. विशेष म्हणजे, त्याकाळी कोणतेही आधुनिक उपचार नसतानाही ती बरगडी नैसर्गिकरीत्या पूर्णपणे जुळली होती. यावरून त्या काळातील मानवाची रोगप्रतिकारक शक्ती आणि घाव भरून काढण्याची क्षमता किती अफाट होती, हे सिद्ध होते. या मॅन ऑफ लॉस विलोसचे वय मृत्यूसमयी ४० ते ४५ वर्षे असावे, असा अंदाज आहे. त्या युगात हे वय दीर्घायुष्याचे मानले जात असे. हा व्यक्ती प्रामुख्याने मासे आणि समुद्री अन्न खाऊन जगत होता.

◆◆◆


## दुर्मीळ पर्वतीय गोरिलाच्या जुळ्यांचा जन्म

आफ्रिकेतील दुर्मीळ आणि संकटग्रस्त प्रजाती असलेल्या पर्वतीय गोरिलांच्या जुळ्यांचा जन्म झाल्याने वन्यजीव संवर्धन क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमधील विरुंगा नॅशनल पार्क येथे नववर्षाच्या सुरुवातीलाच ही दुर्मीळ घटना घडली. पार्कमधील वन्यजीवांवर लक्ष ठेवणाऱ्या कम्युनिटी ट्रॅकर्सनी ३ जानेवारी रोजी या जुळ्या नर गोरिलाच्या पिलांना पाहिले.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, निरीक्षणाच्या वेळी दोन्ही पिले निरोगी दिसत होती. विरुंगा नॅशनल पार्कमधील पर्यावरण निरीक्षण अधिकारी जॅक कातुतु म्हणाले, ‘पर्वतीय गोरिलांमध्ये जुळ्यांचा जन्म अतिशय दुर्मीळ असतो आणि तो नेहमीच जगण्याच्या दृष्टीने मोठे आव्हान ठरतो. आम्ही सावध आहोत, सतर्क आहोत; पण आशाही ठेवली आहे. पहिले चार आठवडे अत्यंत महत्त्वाचे असतात.

**२२ वर्षांची माफुको; जुळ्यांची आई :** या जुळ्यांची आई म्हणजे २२ वर्षांची माफुको. आतापर्यंत ती एकूण सात पिलांना जन्म देणारी अनुभवी गोरिला माता आहे. माफुको ही पार्कमधील बागेनी कुटुंबाची सदस्य असून, या कुटुंबात आता ५९ गोरिला आहेत. त्यामुळे हे कुटुंब आफ्रिकेतील सर्वात जुन्या राष्ट्रीय उद्यानातील सर्वात मोठे पर्वतीय गोरिला कुटुंब ठरले आहे.

**पर्वतीय गोरिलांची वैशिष्ट्ये :** पूर्व आफ्रिकन गोरिलांची उपप्रजाती असलेले पर्वतीय गोरिला ८ हजार ते १३ हजार फूट उंचीवरील जंगलांमध्ये राहतात. थंड हवामानामुळे त्यांचे केस दाट आणि जाड असतात. त्यांचे वजन



२०० किलोंपर्यंत जाऊ शकते, तर उंची साधारण साडेपाच फुटांपर्यंत असते.

**विरुंगा पार्क गोरिलांचे सुरक्षित आश्रयस्थान :** विरुंगा नॅशनल पार्कमध्ये सध्या सुमारे ३५० पर्वतीय गोरिला आहेत. जगभरात एकूण अंदाजे १,०७५ पर्वतीय गोरिला शिल्लक असून ते काँगोसोबतच रवांडा आणि युगांडामध्येही आढळतात.’

**नामशेष होण्याच्या उंबरठ्यावरून पुनरुज्जीवन :** १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला युद्ध, शिकार आणि मानवी हस्तक्षेपामुळे पर्वतीय गोरिलांची संख्या २५० पेक्षाही कमी झाली होती. एकेकाळी ही प्रजाती पूर्णपणे नष्ट होईल, अशी भीती व्यक्त केली जात होती. मात्र, गेल्या सुमारे चार दशकांत सतत आणि कठोर संवर्धन प्रयत्नामुळे त्यांची संख्या पुन्हा हजाराच्या पुढे गेली. याच यशामुळे २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटनेने या प्रजातीचा दर्जा ‘क्रिटिकली एंडेंजर्ड’ वरून ‘एंडेंजर्ड’ असा बदलला. या पार्श्वभूमीवर, विरुंगा नॅशनल पार्कमधील जुळ्या गोरिलांचा जन्म हा केवळ आनंदाची बातमी नाही, तर संवर्धन प्रयत्नांना मिळालेली मोठी प्रेरणा मानली जात आहे.

◆◆◆

# अहिल्यानगरात समस्त आंबेडकरी समाजाचा ६ ऑक्टोबर रोजी विराट संविधान बचाव मोर्चा

### उपवर्गीकरण रद्द करा, संविधान वाचवा!; उपवर्गीकरणाविरोधात तीव्र भूमिका; जिल्ह्यातील नागरिकांनी सहभागी व्हावे : सुरेश बनसोडे



अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी आंबेडकरी समाजाच्या वतीने विराट संविधान बचाव मोर्चा काढण्यात येणार आहे यासाठी आयोजिण्यात आलेल्या बैठकीत मोर्चाचे आयोजक अध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे आदी.

नगर – अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी तसेच संविधान आणि सामाजिक न्यायाच्या संरक्षणासाठी ६ ऑक्टोबर रोजी नगर शहरात समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने आणि आनंदराज आंबेडकर यांच्या उपस्थितीत विराट संविधान बचाव मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात जिल्हाभरातील आंबेडकरी समाजबांधव, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शासकीय सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी आणि संविधानप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मोर्चाचे आयोजक अध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील शासकीय विश्रामगृह येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांची बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी एन. एम. पवळे होते. प्रारंभी अशोक गायकवाड, त्यांच्या पत्नी, राजाभाऊ कापसे तसेच अन्य दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी विविध विषयांवर आपापली मनोगते व्यक्त केली. बैठकीदरम्यान ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सुरेश बनसोडे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. यावेळी सुमेध गायकवाड, संजय खामकर, किरण दाभाडे, सुनील क्षेत्रे, निवृत्ती आरु, विलास साठे, सुनील शिंदे, राजेंद्र साळवे, विशाल गायकवाड, नाथा आल्हाट, विजयराव भांबळ, प्रा जाधव सर, महेंद्र राजगुरु, शाहुराव साळवे, महेश भोसले, भाऊ भिंगारदिवे, विशाल कांबळे, अक्षय भिंगारदिवे, सिद्धार्थ आढाव, प्रशांत गायकवाड, गौरव गव्हाळे, दीपक पाटोळे, पवन भिंगारदिवे, हर्षल गायकवाड, प्रा. भीमराव पगारे, जाधव एल बी, संदीप वाकचौरे, समीर भिंगारदिवे, प्रदीप जाधव, भास्कर भैलूमे, शनेश्वर पवार, सोमनाथ साठे, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, निखिल साळवे, चिकू गायकवाड, गणेश गायकवाड, शांतवंन साळवे, श्रीकांत भोसले, जयश्री गायकवाड, गौतमी ताई भिंगारदिवे, सारिका गांगर्ड, माया जाधव, सागर ठोकळ, सचिन शेलार, महेश अंधारखे, दिनेश पंडित, विनोद भिंगारदिवे, चंद्रकांत भिंगारदिवे आदीसह आंबेडकरी समाज बांधव उपस्थित होते.

बैठकीत अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयावर सविस्तर चर्चा झाली. या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असून, विविध समाजघटकांमध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण होऊ शकते, अशी चिंता उपस्थितांनी व्यक्त केली. भारतीय राज्यघटनेच्या परिशिष्टात समाविष्ट अनुसूचित जातींच्या यादीत बदल करण्याचा अधिकार संसदेला असल्याचे मत मांडत उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द होईपर्यंत संविधान आणि सामाजिक न्यायाच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. यासाठी जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी समाजबांधव, सामाजिक संघटना आणि संविधानप्रेमी नागरिकांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

#### मोर्चाचा मार्ग

६ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात होणार असून, छत्रपती शिवाजी महाराज चौक, माळीवाडा, पांचवीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, तेली खुंट, नेतासुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा आणि दिल्ली गेट मार्गे नीलक्रांती चौक येथे मोर्चाचा समारोप होणार आहे.

या बैठकीस समस्त आंबेडकरी समाजाचे अनुयायी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शासकीय सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. बैठकीत ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विराट संविधान बचाव मोर्चात जिल्ह्यातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.



## गुरूवाणी ५४
## तीर्थंकर नाम कर्म बंध

'बंध'चे २ प्रकार आहेत. एक 'निकाचित' बंध असते ते तुम्ही कितीही प्रयत्न केले तरी बदलू शकत नाही. दुसरे 'अनिकाचित' बंध ज्याला तुम्ही बदलू शकता, सुधारू शकता. दोन्ही बंध पुण्याचे ही होतात आणि पापाचेही होतात. यातील सर्वश्रेष्ठ निकाचित बंध म्हणजे तीर्थंकर नाम कर्म बंध. हे बंध एकदा झाले तर इतर सर्व कर्मांचा क्षय निश्चित होतो. या कर्माचे दुसरा परिणाम म्हणजे स्वतःबरोबर दुसऱ्यांतही बदल करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. तीर्थंकर नाम कर्म बंध झाल्यानंतर दुसऱ्या कोणत्याही अशुभ नाम कर्माचे बंध होत नाही, फक्त पुण्य बंधच होईल. सगळे जग त्याला वंदन करते. त्याच्यासमोर साप आणि मुंगूसही वैर सोडून मित्र बनून राहतात. तो दुःखाच्या वातावरणातही दुःखी नसतो. चंडकौशिक समोर भगवान महावीर आल्यावर त्याच्यात बदल झालाच. त्याचे कर्म, मूळ स्वभाव बदलला. गुरूदेव आचार्यश्रींसमोर बसल्यावर प्रत्येकाचे मन शांत व्हायचे, याचा अनुभव अनेकांना आला असेल. याठिकाणी अनेकांनी अट्ठाई तप केले. हे केवळ गुरूदेवांच्या कृपेनेच झाले. एखाद्याला पोहता येत नाही पण तो जर जहाजात बसला तर तो सुरक्षित राहतो. तीर्थंकरांची भक्ती करणे म्हणजे त्यांच्या सुरक्षित जहाजात बसणे होय. कंपनी त्यांची आहे आणि आपण शेअर होल्डर होतो. असे बंध तीर्थंकरांशी बांधले तर पाप सुद्धा पुण्यात बदलेल. तीर्थंकरांची नौका शाश्वत आहे. गणेशोत्सवात पुण्यात दगडूशेठ हलवाई गणपती समोर दरवर्षी हजारो महिला एकत्र येऊन गणपती अथर्वशीर्ष पठण करतात. एका वर्षी सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने रस्त्यावर अथर्वशीर्ष पठण करण्यास मनाई केली. तरीही महिलांनी श्रद्धा ठेवून स्वतःच्या जबाबदारीवर

अथर्वशीर्ष पठण केलेच. अशीच नितांत श्रद्धा असलेले भगवान महावीरांचे भक्त तयार व्हावेत. हजारो कंठांतून एकाच वेळी महावीरांचे स्तुती गान व्हावे. गुरूदेवांच्या भूमीत तर हे व्हायलाच हवे. जे शक्य आहे ते तर होईलच. पण जे शक्य वाटत नाही ते सुद्धा तीर्थंकर, गुरूदेवांच्या कृपेने होऊ शकते. मी भगवान महावीरांचा साधक आणि गुरूदेवांचा शिष्य आहे. म्हणूनच मला विश्वास आहे, 'हर कंठसे गुंजेगा भगवान महावीर का गान'. तीर्थंकर महावीरांशी असे बंध बांधायचे की ते स्वतः तुम्हाला शोधत आले पाहिजेत. जगात अनेक भगवान आहेत, जे मिळावेत म्हणून भक्त कठोर तपस्या करतात. भगवान महावीर वेगळे आहेत, ते भक्ताला भेटण्यासाठी स्वतः तपस्या करतात.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# केडगाव परिसरात तरुणीचा पाठलाग करत विनयभंग

नगर – शहरातील केडगाव परिसरातून कामासाठी पायी चाललेल्या एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १७ सप्टेंबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास संबंधित तरुणी केडगाव येथील अमरधाम परिसराजवळून तिच्या नेहमीच्या कामासाठी पायी चालली होती. त्यावेळी कांबळे नावाचा तरुण (रा. दूधसागर सोसायटी, आदर्श सोसायटी, केडगाव, अहिल्यानगर) हा तिच्या पाठीमागून मोटारसायकलवरून आला. त्याने तरुणीला आवाज देऊन थांबवले आणि तू मला खूप आवडतेस, तू माझ्याशी लग्न कर असे म्हणाला. त्यानंतर आरोपीने बळजबरीने तिचा उजवा हात पकडून तिला स्वत:कडे खेचण्याचा प्रयत्न केला. याद्वारे तरुणीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य त्याने केले.

याप्रकारानंतर घाबरलेल्या पण धाडसी तरुणीने तातडीने कोतवाली पोलीस ठाणे गाठून घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. तिच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कांबळे नावाच्या तरुणाविरुद्ध विनयभंग तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोहोचविण्यासाठी दिलेल्या मालाची परस्पर विल्हेवाट लावून ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाची १ लाख २२ हजारांची फसवणूक

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाचा माल निश्चित ठिकाणी न पोहोचवता परस्पर नांदेडला नेऊन १ लाख २२ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दत्तातय जयसिंग जाधव (वय ४६, रा. सारोळा कासार, ता. नगर) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून नीरज (पूर्ण नाव माहित नाही), अभिषेक सतीश शिंदे (मु. पो. शेगाव, ता. उदगीर, जि. लातूर) आणि कोंडीबा गोपीनाथ कांबळे (रा. उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही घटना १२ मार्च २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास सारोळा कासार येथे घडली. आरोपींनी फिर्यादी यांच्या ऑर्डरमधील माल ठरलेल्या ठिकाणी न नेता परस्पर नांदेड येथे नेला. यानंतर फिर्यादी यांनी फोन करून विचारणा केली असता, 'तुम्ही माल क्रॉसिंग करून घेऊन जा' असे सांगून टाळाटाळ केली. आरोपींनी संगनमताने आणि लुबाडण्याच्या हेतूने चालाखीने मालाची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून फिर्यादीची १ लाख २२ हजार रुपयांची फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

याप्रकरणी १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात तिघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. किशोर लाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# केटरर्स, मंगल कार्यालये आणि लॉन्स चालकांनी अन्न व औषध प्रशासनाकडून नोंदणी-परवाना घ्यावा

### सहाय्यक आयुक्त गौरव जगताप यांचे आवाहन; अहिल्यानगर केटरिंग असोसिएशनच्या कार्यशाळेत मार्गदर्शन




राज्याचे अन्नसुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, सह आयुक्त माने यांच्या निर्देशानुसार अहिल्यानगर केटरिंग असोसिएशन आयोजित कार्यशाळेत केटरिंग व्यावसायिक, मंगल कार्यालये व लॉन्स चालकांना नोंदणी, परवाना, कायदेशीर प्रक्रिया आणि अन्नसुरक्षा नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

नगर – केटरिंग व्यावसायिक, मंगल कार्यालये, लॉन्स तसेच सार्वजनिक स्वरूपात अन्नसेवा देणाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासनाकडे नोंदणी करून परवाना घेणे आवश्यक आहे. अन्नसेवा नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असल्याने अन्नसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गौरव जगताप यांनी केले.

राज्याचे अन्नसुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, सह आयुक्त माने यांच्या निर्देशानुसार अहिल्यानगर केटरिंग असोसिएशनतर्फे नगर–कल्याण रोडवरील जाधव लॉन्स येथे आयोजित कार्यशाळेत केटरिंग व्यावसायिक, मंगल कार्यालये व लॉन्स चालकांना नोंदणी, परवाना, कायदेशीर प्रक्रिया आणि अन्नसुरक्षा नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. १०० पेक्षा अधिक लोकांना सार्वजनिक भोजन देण्यात येणार असल्यास कार्यक्रमाच्या किमान आठ दिवस आधी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अन्न तयार करणे, स्वच्छता, हाताळणी, साठवणूक व वितरणाबाबतही काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

नियमभंग किंवा अन्नसुरक्षेतील गंभीर त्रुटी आढळल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल. त्यामुळे व्यावसायिकांनी कारवाईची वाट न पाहता आवश्यक नोंदणी व परवाने पूर्ण करावेत, असे जगताप यांनी सांगितले.

असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी व्यावसायिकांच्या समस्या प्रशासना–समोर मांडून नियम, प्रक्रिया आणि प्रशासनाशी समन्वयाबाबत सहकार्याची मागणी केली. प्रश्नोत्तर सत्रात अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.

कार्यशाळेला अन्नसुरक्षा अधिकारी साजिदा मुल्ला यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. हेमराज केटरर्सचे विश्वजीत बोरा यांनी प्रास्ताविक केले, तर मकरंद घोडके यांनी सूत्रसंचालन केले. जालिंदर वाळके यांनी आभार मानले.

यावेळी मूलचंद महाराज, पवन खंडेलवाल, किशोर उपाध्ये, रवी उपाध्ये,जालिंदर वाळके, गोटू खंडेलवाल, अजय नरवडे, अमित पटवा, अशोक काटकर, सचिन रणसुंबे, निशांत भोगे, गौतम गुगळे, कृष्णा शर्मा, सुदर्शन कुंटे, बन्सी महाराजचे संजय जोशी, किशोर नेवासकर, चेतन शर्मा, भरत शर्मा, बाळू गुगळे, सुरज पडोळे, हेमंत महाराज, बाळासाहेब भुतकर, संतोष गुगळे, कैलास केटरर्सचे कैलास खरपुडे यांच्यासह केटरिंग व्यावसायिक व सभासद उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या केटरिंग व्यवसायाची गुणवत्ता व विश्वासार्हता टिकवण्यासाठी चवदार अन्नासोबत सुरक्षित आणि दर्जेदार अन्न देणे ही व्यावसायिकांची जबाबदारी असल्याचा संदेश कार्यशाळेत देण्यात आला.

# बालसंगोपन योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अकोलेतच करावी : जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

### श्री समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीचे निवेदन



बालसंगोपन योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अकोलेतच करावी, या मागणीचे निवेदन रूपाली रेणुकदास यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुक्यातील एकल महिलांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना दिले.

नगर – महाराष्ट्र शासनाच्या बालसंगोपन योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या एकल महिला व त्यांच्या मुलांची चौकशी व पडताळणी अहिल्यानगर येथे न करता अकोले येथेच करण्यात यावी, अशी मागणी श्री समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत समितीच्या अध्यक्षा रूपाली रेणुकदास यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुक्यातील एकल महिला यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना निवेदन दिले. यानंतर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी संजय कदम यांना कार्यवाहीचे निर्देश दिले.

अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या वतीने एकल महिलांच्या मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी राबविण्यात येणारी बालसंगोपन योजना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. मात्र, या योजनेच्या लाभार्थींची चौकशी व पडताळणी करण्यासाठी अकोले विधानसभा मतदारसंघातील एकल महिला व त्यांच्या मुलांना अहिल्यानगर येथे उपस्थित राहावे लागते. अकोले ते अहिल्यानगर हे अंतर सुमारे १३० किलोमीटर आहे. तर मतदारसंघातील घाटघर, बिताका, जाचकवाडी, कुमशेत, बारी आदी दुर्गम व आदिवासी भागातील गावांपासून अहिल्यानगरचे अंतर १७५ किलोमीटरपर्यंत आहे. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील एकल महिलांना या प्रक्रियेसाठी मोठा प्रवास करावा लागतो. अनेक महिला रोजंदारी अथवा दैनंदिन कामावर अवलंबून असल्याने अहिल्यानगरला जाण्यासाठी त्यांना प्रवासाचा खर्च करावा लागतो. तसेच त्या दिवसाची रोजची मजुरीही बुडते. सकाळी लवकर घरातून निघून सायंकाळी पुन्हा घरी परतणे अनेक महिलांसाठी अडचणीचे ठरते. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित बालसंगोपन समितीने लाभार्थी महिलांना अहिल्यानगर येथे न बोलावता अकोले येथे येऊनच लाभार्थी महिला व संबंधित व्यक्तींची चौकशी व पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे महिलांचा प्रवासाचा खर्च वाचेल, रोजंदारी बुडणार नाही आणि त्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणार नाही. तसेच स्थानिक पातळीवर आवश्यक चौकशी व पडताळणी करणेही शक्य होईल.

आदिवासी महिला व त्यांच्या कुटुंबांची परिस्थिती लक्षात घेऊन बालसंगोपन योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अकोले येथेच घेण्याचे निर्देश संबंधित समितीला द्यावेत, अशी मागणी अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी छबाबाई डहाळे, योगिता बेनके, सविता जाधव, भारती धोंडबरे, गीता मेंगाळ, प्रियांका भोजने, जिजाबाई धाडवड, सुमित्रा भांगरे, नंदा सदगीर, रजिया शेख, कविता गावंडे, चंद्रकला पुंडे आदी एकल महिला उपस्थित होत्या.



फकिरवाडा भागातील गोविंदपुरा येथील यशवंतनगरमध्ये पाण्याची पाईपलाइन फुटल्याने रस्त्यावर पाणी वाहत आहे. विशेष म्हणजे या भागातच महापौर ज्योतीताई गाडे राहतात. या पाण्याचा तातडीने अपव्यय थांबविण्याची मागणी नागरिक करीत आहे. (छाया – विजय मते)

# विजय पठारे, अजय पठारे यांच्या विरोधात मोक्काअन्वये पुरवणी दोषारोपपत्र दाखल

नगर – तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील कुख्यात आरोपी विजय राजू पठारे व अजय राजू पठारे यांच्यासह पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अन्वये विशेष मोक्का न्यायालयात १७ सप्टेंबर रोजी तब्बल २२४ पानी पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलमांसह आर्म अ‍ॅक्ट अन्वये १५ मार्च २०२६ रोजी १९:२८ वाजता आरोपी विजय राजू पठारे, अजय राजू पठारे, किरण मोहन जेधिया, सनी रणजीत चावरे व निलेश बाबासाहेब ससाणे (सर्व रा. सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील सर्व आरोपी हे सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याविरुद्ध तोफखाना, कोतवाली व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनमध्ये शरीराविरुद्ध व मालाविरुद्ध अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी संघटितपणे हे कृत्य केल्यामुळे सदर गुन्ह्यात मोक्का कायद्याची कलमे वाढविण्याबाबतचा प्रस्ताव नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात आला होता. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांनी केला.

सदर गुन्ह्यात आरोपी विजय राजू पठारे याच्याविरुद्ध एकूण ९ गुन्हे दाखल असून, आरोपी अजय राजू पठारे याच्याविरुद्ध एकूण ५ गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणात सबळ पुरावा गोळा करून मोक्का कलमान्वये पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक कार्यालयात मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या कार्यालयाने मंजुरी दिल्यानंतर १७ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथील विशेष मोक्का न्यायालयात २२४ पानांचे पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

ही कारवाई नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांनी केली आहे.

